Issue 31 December 2025

# मराठी मंडळ आयर्लंड

प्रस्तुत



वार्षिक अंक

# आभा

## वर्ष: दुसरे

**आभा...आयर्लंड मधे आपली मनोगते, लेख, कथा, काव्य व इतर अनेक वाचनीय सदरे यासाठीचे हक्काचे व्यासपीठ.**

# CONTENTS


1 MMI परिचय 4-5

परिचय आणि उद्दिष्टे 4

आतापर्यंतची वाटचाल 4-5

2 संपादकीय

आभा - मराठी मंडळ आयर्लंड वार्षिक अंक 6

मराठी मंडळ आयर्लंड - पुढील वाटचाल 6

3 कार्यकारी समिती 7-9

4 संस्कृती आणि परंपरेचे स्फूर्तिमय पर्व 10-11

5 Women Power - स्त्री शक्ती 12-16

Following My Rhythm: My Dance Journey in Ireland 13-14

Salute to My Wife, Vaishnavi Pawar:
From Silent Sacrifices to Entrepreneurial Success. 15-16

6 Unique Hobbies - आगळे वेगळे छंद 17-21

गायन – माझा आवडता छंद 18-19

ओमकार साधना 20-21

7 Fine Arts and Aesthetics - ललित 22-25

मी अस्वस्थ 23

शुभ्रा 24

लावण्या 24

# CONTENTS


हेमांग 25
बिलोर 25

8 Stories of Integration - समावेश कथा 26-36
Ella Never Gives up! 27
परदेशात शिक्षणाची सुवर्णसंधी: महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती आणि माझा अनुभव. 28-29
एमराल्ड लँड ते माझी माती, माझी माणसं 30-32
लॉंग्रे पासून जागतिक मंचापर्यंतचा प्रवास 33-34
ऋणानुबंध 35-36

9 Travelogue - प्रवास वर्णन 37-52
आयर्लंड ते फ्रान्स: मोटारसायकलवरचा स्वप्नवत प्रवास 38-40
Eiffel Tower to Alps Adventurous Family Journey 41-43
एक ऐतिहासिक सहल 44-45
Thanjavur: The Tamil-Marathi Connection 46-48
अनोळखी माणसं, अविस्मरणीय अनुभव 49-52

10 Marathi Mandal Ireland! घरापासून लांबचं घर 53

11 कार्यक्रम दिनदर्शिका 55-56

12 जल्लोष यंदाचा 57

# मराठी मंडळ आयर्लंड



## परिचय आणि उद्दिष्टे

आयर्लंडमधील मराठी समाजाला एकत्र आणणे आणि मराठी संस्कृतीचे संवर्धन हे आमचे उद्दिष्ट! आयर्लंडमध्ये राहणाऱ्या मराठी माणसांना सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून एकत्र आणणे, आणि नव्या पिढीला त्यांच्या सांस्कृतिक वारस्याशी जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे. मंडळाचे सर्व उपक्रम ना-नफा तत्त्वावर चालविले जातात.

## आतापर्यंतची वाटचाल

मंडळाची सुरुवात ही २००८ मधे झाली. आपल्यातीलच काही मराठी बांधवांनी स्टीफन्स ग्रीन गार्डन मधे एकत्र येऊन मराठी कुटुंबांना एकमेकांशी जोडण्याचे, विविध सण आणि उत्सव जल्लोषात साजरे करून समाजाला मजबूत करण्याचे ध्येय ठेवले आणि २००८ मध्ये मराठी मंडळ आयर्लंड ही संकल्पना प्रत्यक्षात आली.

गाण्याच्या मैफिली, कॉफी मिटिंग्स, पॉटलक पार्ट्या, गुढीपाडवा, पॉवर्सकोर्ट गार्डन ला सहल अशा विविध उपक्रमांनी लोकांना २००८ ते २०११ दरम्यान जवळ आणले. दुसऱ्या पर्वात 'केसरी टुर्स अँड ट्रॅव्हल्स' च्या सहभागाने मंडळाची लोकप्रियता वाढली. मराठी मंडळाने 'साद', 'जल्लोष' असे मोठे कार्यक्रम आणि त्याबरोबरच सहली व धप्पा, उबुंटू, पावनखिंड असे चित्रपट आयोजित केल्याने मंडळाची आणि नात्यांची वीण घट्ट झाली. २०१७ मध्ये सुरु झालेल्या गणेशोत्सवाने मराठी समुदायाची एकात्मता दाखवली. पारंपारिक भजने, गीते, आणि नृत्याने बाप्पाच्या आराधनेत रंग भरले. जल्लोषने पुन्हा एकदा सर्व मराठी समुदायाला आपल्या विविध कला व गुणदर्शन यांमध्ये रंगवून टाकले.

२०२४ साली मराठी मंडळ आयर्लंडने मंडळाची नवीन वेबसाइट, ढोल-ताशा-ध्वज पथकाची, म्हणजेच ‘ब्रह्मगर्ज’ ची स्थापना, बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धांचे आयोजन असे विविध उपक्रम केले.

२०२५ मध्ये मंडळाने अनेक उपक्रम राबवले. त्यात विशेष उल्लेखनीय ठरले ते म्हणजे सुप्रसिद्ध क्रिकेट समीक्षक श्री. सुनंदन लेले यांचा ‘बारा गावचे पाणी’ हा **live show**, मराठी विद्यार्थ्यांसाठी अनेक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शनपर मेळावा, बॅडमिंटन टूर्नामेंट, व श्री. दिलीप प्रभावळकर ह्यांच्या अभिनयाने नटलेल्या "दशावतार" ह्या चित्रपटाचे डब्लिन येथील **Odeon** मध्ये केले गेलेले प्रदर्शन. ह्या चित्रपटाच्या आयोजनाला अतिशय कमी वेळ मिळूनही केवळ मराठी मंडळींनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे शो हाऊसफुल झाला. व गणेशोत्सव अतिशय जोशात साजरा झाला. ह्या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्य म्हणता येईल ते म्हणजे सुप्रसिद्ध गायिका वैशाली सामंत यांचा गायनाचा कार्यक्रम. मराठी नाट्य व चित्रपट सृष्टी च्या कलाकारांना मानवंदना देणाऱ्या ह्या वर्षीचा जल्लोष सोहळ्याला संपूर्ण आयर्लंड मधून उदंड प्रतिसाद मिळाला.

ह्या वर्षी ब्रह्मगर्ज चा ताफा मोठा होऊन तब्बल १२ ढोल व ६ ताशांचा झाला. ब्रह्मगर्ज च्या सदस्यांनी गाल्वे च्या **St Patrick’s Day Parade** मध्ये भाग घेऊन भगवा झेंडा उंच फडकावला. त्या सोबतच **Cork** च्या **Carrigaline Cultural** परेड आणि जल्लोष मध्ये पण आपला वादन सादर केले.

मराठी मंडळ आयर्लंड ने आपल्या आतापर्यंतच्या म्हणजेच १७ वर्षांच्या प्रवासात अनेक लोकप्रयोगी उपक्रम राबविले. आयर्लंडमधील मराठी समाजाकडून या सर्व उपक्रमांना भरभरून साथ व प्रोत्साहन मिळाले. त्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार. आपण सर्वांच्या पाठिंब्याने हा प्रवास अखंड सुरु राहील यात शंका नाही.



# संपादकीय




## आभा - मराठी मंडळ आयर्लंड वार्षिक अंक

'आ' आयर्लंड चा व 'भा' भारताचा, या मेळातून तयार झालेले हे अंकनाम!
मराठी मंडळ आयर्लंडचा हा वार्षिक अंक मराठी समुदायाच्या भारत ते आयर्लंड च्या प्रवासाचे आणि त्यासोबत येणाऱ्या आव्हानांचे, धैर्याचे व यशाचे प्रतिबिंब आहे.

एक महाराष्ट्रीय म्हणून आपल्याला अभिमान वाटावा असे कार्य करणारी अनेक मंडळी आपल्यात आहेत ही समुदायासाठी भाग्याची गोष्ट आहे. हा अंक अश्या प्रेरणादायी कार्यांची ओळख आपल्या समोर घेऊन येत आहे. त्यासोबत मराठी भाषा, संस्कृती, परंपरा, कला ह्यांच्या जतनासाठी जे कार्य केले जात आहे ते आवर्जून अंकात गौरविले आहे. अश्या चांगल्या कार्यामुळेच पुढे चालून मराठी मूल्यांचा आदर करणाऱ्या, त्याचे जतन करणाऱ्या पिढ्या घडत राहतील असा आम्हास विश्वास आहे.

हा अंक आपल्या परंपरा, संस्कृती, आणि एकतेचे प्रतीक आहे. या अंकाद्वारे आपली कला, विचार, आणि अनुभव प्रकट करण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण केले आहे. वार्षिक अंक हा मराठी मंडळ आयर्लंडच्या प्रवासाचा महत्त्वाचा भाग आहे, आणि आयर्लंड मधील सर्व मराठी बांधवांच्या सहकार्यानेच हा अंक समृद्ध झाला आहे. ह्या योगदानासाठी सर्वांचे मनःपूर्वक आभार.

## मराठी मंडळ आयर्लंड - पुढील वाटचाल

येणाऱ्या नवीन वर्षात व त्या पुढेही, मराठी मंडळ आयर्लंडमधील मराठी समुदायाच्या सांस्कृतिक जडणघडणीला अधिक मजबूत करण्यासाठी विविध उपक्रम आणि कार्यक्रमांची आखणी करीत राहील. मंडळाचे उद्दिष्ट मराठी समाजासाठी एक मंच तयार करणे आहे, जे स्थानिक आणि जागतिक स्तरावर आपली परंपरा, कला, संगीत, साहित्य, आणि इतर सांस्कृतिक मूल्ये साजरी करण्याचे स्थान ठरेल. याशिवाय, शैक्षणिक, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील उपक्रम राबवून, आपल्या सदस्यांना परदेशात ह्या सहसा न मिळणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत राहू.

# कार्यकारी समिती - मराठी मंडळ आयर्लंड



## महेश कोडिलकर

मी २०१६ पासून कॉर्क येथे स्थायिक व २०१७ पासून मराठी मंडळ आयर्लंड चा स्वयंसेवक आहे. समस्त मराठी बांधवांना सोबत घेऊन लोकप्रिय व उपयुक्त असे अनेक कार्यक्रम मंडळाच्या वतीने आयर्लंड मधे सुरु करुन यशस्वी करण्यास प्रयत्नशील राहू.



## चिन्मय सहस्रबुद्धे

मी 2015 पासून डब्लिनमध्ये राहत आहे आणि 2016 पासून मराठी मंडळ आयर्लंडमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करत आहे. सामाजिक एकात्मता हे मराठी मंडळाचे उद्दिष्ट आहे आणि आम्ही विद्यार्थी आणि आयर्लंडमध्ये येणाऱ्या नवीन लोकांसाठी उपयुक्त असे काम करत राहू.



## सुरश्री भट गोखले

मी आयर्लंडमध्ये ११ वर्षे स्थायिक असून २०१७ पासून आयोजक समितीचा भाग आहे. आयर्लंडमधील माझ्या प्रवासात एमएमआयने खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आयर्लंडमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी समर्पित खास कार्यक्रम आयोजित करण्याची इच्छा आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, संसाधने आणि समुदायाची ओळख मिळू शकेल.



## मनोज धिर्डे

२००६ पासून आयर्लंडमध्ये वास्तव्यास असून, प्रॉडक्ट बेस्ड सॉफ्टवेअर कंपनीमध्ये हेड ऑफ प्रोफेशनल सर्व्हिसेस म्हणून कार्यरत आहे. २०११ पासून मराठी मंडळ आयर्लंडशी स्वयंसेवक म्हणून संलग्न असून, २०१७ मध्ये मराठी मंडळ आयर्लंडची अधिकृत नोंदणी करण्यात योगदान दिले आहे. इतरांना मदत करण्याची, विशेषतः आयर्लंडमधील भारतीय बांधवांना शक्य त्या प्रत्येक प्रकारे मदत करण्याची आणि सामाजिक कनेक्शन्स बनवण्याची आवड आहे.



## मनीष गाजरे

डिसेंबर २०१२ पासून आयर्लंड मध्ये वास्तव्य. २०१६ साली प्रथमच पिकनिक पासून मराठी मंडळा सोबत जोडलो गेलो. तेव्हा पासूनचे स्नेहबंध अजूनच फुलत गेले. मंडळातील सर्व कार्यकर्ते आणि सहभाग घेणारे मित्र मंडळी हुरूप देत असतात. नवनवीन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहू.



## मयूर महाजन

गेल्या पाच वर्षांपासून मी MMI टीमचा एक सक्रिय भाग आहे. या प्रदीर्घ प्रवासात मला नवनवीन अनुभव मिळाले असून, सामाजिक कार्याची माझी ओढ अधिक दृढ झाली आहे. मंडळाच्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करताना मिळणारे समाधान अमूल्य आहे. आयर्लंडमधील आपल्या वाढत्या समाजाला एकत्र आणून, एकजुटीने दर्जेदार उपक्रम राबवणे हेच आमचे पुढील ध्येय आहे.

# कार्यकारी समिती - मराठी मंडळ आयर्लंड



### वेदांग भिडे

२०१९ पासून मी आयर्लंडमध्ये वास्तव्यास आहे. सध्या Technical Product Owner म्हणून कार्यरत आहे. गेल्या ४-५ वर्षांपासून मी MMI या संस्थेशी सक्रियपणे जोडलेली आहे. तसेच MMI अंतर्गत असलेल्या ब्रह्मगर्ज ढोल-ताशा पथकाचा मी एक सदस्य आहे. लोकांना जोडण्याची व सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याची माझी आवड आणि तत्परता सदैव जोपासेन.




### शुभम वडझिरकर

२०१९ साली ट्रिनिटी कॉलेज डब्लिन येथे MSc Management पदवीसाठी मी आयर्लंडमध्ये आलो. २०२१ पासून मराठी मंडळ आयर्लंड (MMI) चा सदस्य असल्याचा मला अभिमान आहे. स्थानिक व्यवसायांशी सहकार्य करत मराठी मंडळाच्या सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांसाठी प्रायोजकत्व (Sponsorship) मिळवून देण्यामध्ये मी सक्रिय योगदान देत आहे.



### कोमल बोराडे

मी विद्यार्थी म्हणून २०२१ मध्ये आयर्लंडला आले आणि मराठी मंडळ आयर्लंडमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले. इथे मला आपुलकीची कम्युनिटी मिळाली आहे; तिच्यासाठी काम करण्याची संधी मिळाल्याचा मला मनापासून आनंद आहे आणि नवे उपक्रम राबवण्याचा माझा प्रयत्न राहील.



### श्रीवर्धन लिंबकर

मराठी मंडळामधे २०२१-२०२२ पासून कार्यरत असून, नोंदणी आणि तिकीट विभाग यामध्ये मुख्य योगदान आहे. आयर्लंड मराठी मंडळासाठी दृष्टीकोन म्हणजे सामाजिक ऐक्य व कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करणे. पोर्टलीश येथे स्थायिक.



### सेजल जामसंडेकर

मुंबईहून २०१७ मध्ये आयर्लंडला मास्टर्ससाठी आले. घरापासून लांब असूनही समान विचारांची माणसं भेटावीत म्हणून 2024 मध्ये मराठी मंडळच्या स्पॉन्सरशिप टीममध्ये स्वयंसेवक म्हणून जोडले गेले. आज EC मेंबर असल्याचा खूप अभिमान वाटतो आणि कम्युनिटीला सपोर्ट करता येतंय हे विशेष.



### शेफाली परदेशी-ढोकले

मी २०१९ पासून डब्लिन मध्ये वास्तव्यास आहे आणि तेव्हा पासून मराठी मंडळाच्या सर्व कार्यक्रमांना कार्यकर्ता म्हणून हजर असते. सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड तसेच सामाजिक अथवा विविध स्तरातील, वर्तुळातील लोकांची या निमित्ताने होणारी भेट ही मराठी मंडळांशी जोडले जाण्याची प्रमुख कारणे आहेत. याच सोबत मी ब्रम्हगर्ज पथकाची सदस्या पण आहे.

# कार्यकारी समिती - मराठी मंडळ आयर्लंड



**सिद्धार्थ नवीनचंद्र मुळे**

मी मराठी मंडळ आयर्लंड साठी २०२३ पासून काम करत आहे. मराठी मंडळ आयर्लंड नी जी परंपरा २००८ पासून सुरवात केली आहे, त्याला पुढे घेऊन जाणे आणि आपल्या लोकांना परदेशा मधे मदत करणे आणि MMI च्या कार्याचा प्रवास पुढे घेऊन जाणे हे माझे हेतू आहे.



**सागर देवगिरकर**

२०२० पासून आयर्लंड मध्ये वास्तव्य. मराठी मंडळ आयर्लंडशी २०२४ मध्ये जोडल्या गेलो. मंडळाच्या विविध कार्यक्रमांमध्ये फोटोग्राफी, कन्टेन्ट डिझायनिंग व ब्रह्मगर्ज ढोल ताशा पथकात वादन करतांना नेहमीच्या जॉब शिवाय मन रमतं व इतर लोकांशी जोडल्या गेलो. मंडळाने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रम व उपक्रमात सहभागी होऊन सामाजिक भावना अधिक सुधृढ होते.

## वार्षिक अंक टीम

मराठी मंडळाचा पहिला अंक "आभा" च्या निर्मितीसाठी अथक परिश्रम घेतलेल्या आणि समर्पणाने काम केलेल्या संपूर्ण टीमचे अभिनंदन, कौतुक आणि जोरदार टाळ्यांचा कडकडाट! लेखांची रचना, संपादन, आणि संकलन यामध्ये त्यांनी केलेली मेहनत खूपच विलक्षण आहे. त्यांच्या क्रिएटिव्हिटी, उत्कृष्ट डिझाइन कौशल्यामुळे आणि प्रयत्नांमुळे संकल्पना अधिक आकर्षक आणि प्रभावी बनल्या आहेत. त्यांचे हे कार्य खूप प्रेरणादायक आहे.



**सागर देवगिरकर**

Magazine Curator & Designer



**महेश कोडिलकर**

Proofreading & Content Support



**श्रीवर्धन लिंबकर**

Content Support



**स्नेहल प्रभुकेळूसकर**


Content Support

# मराठी मंडळ आयर्लंड २०२५

## संस्कृती आणि परंपरेचे स्फूर्तिमय पर्व












२०२५ हे वर्ष मराठी मंडळ आयर्लंडसाठी अत्यंत उत्साहपूर्ण आणि स्मरणीय ठरले. या वर्षात विविध क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातुन मंडळाने आयर्लंडमधील मराठी समाजाला एकत्रित आणण्याच्या अथक प्रयत्नांना एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले. मराठी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून मंडळाने वर्षभर अनेक यशस्वी उपक्रम आयोजित केले.




**बॅडमिंटन टूर्नामेंट**

**Feb '25**

या वर्षी आम्ही बॅडमिंटन स्पर्धेची तिसरी आवृत्ती अत्यंत यशस्वीपणे आयोजित केली. पुरुष दुहेरी (प्रगत व मध्यम) आणि मिश्र दुहेरी अशा तीन गटांमध्ये झालेल्या सामन्यांना उत्स्फूर्त व मोठा प्रतिसाद मिळाला. सर्व सामने अतिशय चुरशीचे, रोमांचक आणि उच्च दर्जाचे ठरले. खेळाडूंनी दाखवलेले कौशल्य, उत्साह आणि खेळभावना यामुळे प्रेक्षकांनीही सामन्यांचा मनमुराद आनंद घेतला. मोठ्या सहभागामुळे प्रायोजकही समाधानी होते.

गॅलवे येथील St. Patrick's Day परेडसाठी ICSC Galway यांनी ब्रम्हगर्ज पथकाला आमंत्रित केले होते. या सुवर्णसंधीचा लाभ घेत ब्रम्हगर्जने गॅलवेच्या प्रेक्षकांसमोर पहिल्यांदाच अस्सल मराठी ढोलताशांची आवर्तने सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. उत्साही व शिस्तबद्ध वादनाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. पारंपरिक नऊवारी साडी व मराठमोळ्या पेहरावातील लेझीम पथकाने ढोलताशांचे दिमाखात नेतृत्व केले. प्रेक्षकांचा प्रतिसाद उदंड होता आणि आयोजकांच्या उत्तम सोयीसुविधांमुळे कार्यक्रमाचा अनुभव अतिशय आनंददायी ठरला.

**Mar '25**



**St Patrick's Day वादन**




**विद्यार्थी मेळावा**

**Apr '25**

Student Event 2025 हा अनेक वर्षांच्या नियोजनानंतर आयोजित करण्यात आलेला पहिला student-focused कार्यक्रम होता. कार्यक्रमात प्रश्नोत्तर सत्र, industry experts सोबत संवाद आणि थेट recruiters सोबत CV review सत्र घेण्यात आले. विद्यार्थ्यांना आपले अनुभव व अडचणी मोकळेपणाने मांडण्याची संधी मिळाली. यावेळी मराठी मंडळाने विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त माहिती असलेला student handbook देखील प्रकाशित केला.

2025 मध्ये मराठी मंडळाने अनेक गोष्टी पहिल्यांदाच केल्या आणि त्यामधील सुनंदन लेले सरांचा “बारा गावचं पाणी” हा कार्यक्रम म्हणजे एक रम्य संध्याकाळ होती. या कार्यक्रमात त्यांच्या क्रिकेट प्रवासाचे जिवंत अनुभव गप्पा मारत-मारत ऐकायला मिळाले. तसेच पडद्यामागील अनेक मजेशीर किस्से क्रिकेटप्रेमींनी मनापासून अनुभवले.

**July '25**




**बारा गावचं पाणी**





**जल्लोष 2025**

**Aug '25**


मराठी मंडळ आयर्लंडचा प्रमुख सांस्कृतिक उत्सव जल्लोष मध्ये “मराठी चित्रपट आणि नाटकांचा सोहळा” या थीमने महाराष्ट्राच्या कलात्मक वारशाला मनापासून सलाम केला. कार्यक्रमात मराठी चित्रपट आणि नाटकांवर आधारित रंगतदार नाटिका, सुरेल संगीत, नृत्याविष्कार आणि दृश्यकथनाने प्रेक्षकांना भुरळ घातली. पारंपरिक ढोल - ताशाच्या गजरात ब्रह्मगर्जाच्या दमदार सादरीकरणाने वातावरण भारून गेले आणि उत्सवाला खास मराठमोळा रंग मिळाला. सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले वैशाली सामंत यांचा लाईव्ह कॉन्सर्ट. त्यांच्या सुरेल आवाजाने आणि जोशपूर्ण सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

सार्वजनिक मागणीला मान देत, दशावतार या मराठी चित्रपटाचे विशेष प्रदर्शन Marathi Mandal Ireland ने अतिशय कमी कालावधीत आयोजित केले. मराठी संस्कृती, मूल्ये आणि मनोरंजन यांचा संगम असलेला हा चित्रपट आयर्लंडमधील समुदायाच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यशस्वी ठरला.

**Oct '25**



**दशावतार**


WOMEN POWER
स्त्री शक्ति

# Following My Rhythm:
## My Dance Journey in Ireland

- Nupoor Mathankar

When I moved to Ireland a few years back, I thought I was coming here mainly for work — a new job, a new life, a chance to start fresh. I didn't realise then how much I would need something familiar to hold on to. For me, that something was dance.

Ireland is beautiful, but it can also be quiet in ways that make you feel your distance from home. I missed the colours, the noise, the comfort of familiarity. In those moments, dance became more than just something I enjoyed. It became a way to feel grounded. When I danced, my body remembered what my mind couldn't always explain. It felt like coming home to myself.

Somewhere along the way, I met Priyanka Patil. From the very beginning, there was an ease between us — the kind that comes when two people speak the same unspoken language. We were both working full-time, managing demanding careers, yet dance kept pulling us back. No matter how busy life became, movement always found a way in.



By day, I work as an Automation Engineer at Pfizer, and Priyanka is a CSV Consultant at Deloitte. Our weekdays are structured and intense, filled with deadlines and responsibilities. Evenings, however, belong to a different part of us. Dance became our release — a space where we could breathe, express, and simply be.

Over time, those shared hours of practice and conversation turned into Rhythmix Dance Dublin, which we officially founded in 2023. We didn't start with a grand plan. We simply wanted a space to dance, to stay connected to our roots, and to share that feeling with others.



We began conducting Bollywood and Semi-Classical workshops in Dublin, focusing not just on steps, but on feeling the music and understanding expression. What we received in return was far more than we expected. People kept coming back — not just to learn, but to connect. Slowly, a beautiful community formed, driven by a shared love for dance and the comfort of moving together.

Alongside workshops, we've had the chance to perform at many events across Ireland

- Jallosh, India Day, India Fest, Kalashree Ireland events, Ireland Maharashtra Mahotsav, Diwali celebrations, and corporate gatherings. We also choreograph for weddings and special occasions, helping people celebrate their most meaningful moments through dance. Every performance feels different, but the intention remains the same — to tell a story through movement.



Dance has also given me the gift of being part of Kalashree Ireland, a group of artists whose passion and dedication deeply inspire me. Being part of productions like Geet Ramayan and Sakhi Re allowed me to explore my Abhinay in ways I hadn't before. Choreographing an entire episode within these productions challenged me creatively and emotionally, and gave me the confidence I will always carry with me.

Balancing art with everyday life isn't easy. There are days when work drains all our energy, yet we still rehearse late into the night. But something shifts the moment the music starts. The tiredness fades, and what remains is presence. Dance has a way of giving back when you feel empty.

Today, Rhythmix feels like more than a dance initiative. It feels like a small family — one built on



shared experiences, encouragement, and love for movement. In a short time, we've created something that feels deeply personal and deeply ours.

Looking back, I realise I may have come to Ireland for my career, but dance gave me a reason to stay. It gave me courage, connection, and a sense of belonging in a place far from home. Dance isn't something I do — it's something I am. It's woven into my childhood, my present, and the person I continue to become.

"प्रवास आवडला, कारण तो नृत्याने सजला."
"नृत्याने दिलं मला धैर्य, आणि ओळखही."



Nupoor Mathankar

Rhythmix Dance Dublin was co-founded by Nupoor Mathankar and Priyanka Patil. Together, they bring the joy of Bollywood and Semi-Classical dance to communities across Ireland through workshops, performances, and a shared love for rhythm.

SK
SUMI'S KITCHEN
Address: Ryan's Beggers Bush parking, lot 115 Haddington Rd,
Dublin, D04 H328
Contact No: 083 312 3848

# Salute to My Wife

## Vaishnavi Pawar: From Silent Sacrifices to Entrepreneurial Success

- Pankaj Sonar

Our story began back in college, where friendship laid the foundation for everything that was to come. We got married in December 2022, and soon after, we moved to Cork, Ireland, on a spouse visa - excited and hopeful about building a new life in a new city and a new country.

From renting our first home to buying a car, we faced many challenges while living on a single income. My wife, who has also been my college friend, stood by me through every up and down. While I was fighting my battles at work and trying to build a stable life away from India, she was silently adjusting to a completely new environment - the weather, the expenses, and the lifestyle - all while managing our home.

She never complained! Even when she was struggling emotionally, she chose to support me and keep me strong. She put her own dreams aside so that I could focus on mine. Because of her emotional strength and constant encouragement, we were able to achieve our short-term goals.

Between 2023 and 2025, life was full of ups and downs. During this time, Vaishnavi's personal growth was remarkable - from an emotional breakdown after losing her father to transforming into a confident businesswoman. We explored different options for her future - jobs that would suit her skills, and opportunities that could help her grow. But there was one talent of hers that I personally admired the most: her cooking skills. Honestly, we never thought of turning that into something big because we weren't sure how it would work. Still, deep down, she always wanted to do something with this passion.

Then came the turning point. One day, when a friend suffered from food poisoning, Vaishnavi jokingly asked if she needed a tiffin. That lighthearted moment sparked an idea - and "VP's Kitchen - Bringing Your Hometown Kitchen to Your Doorstep" was born in 2025.



The business is very new, but it's growing purely through word-of-mouth publicity. One genuine response that touched our hearts was from a customer who had a medical urgency. At just one call, Vaishnavi prepared and delivered a tiffin. They were so happy and blessed to have her help that they sent a gift - not for Vaishnavi, but specifically for her mother, to thank her for raising such a wonderful chef. That gesture spoke volumes about the impact Vaishnavi is creating.


With so much going on, the growth she achieved during these two years, while overcoming deep personal pain, was extraordinary. Her determination

and willpower never faded. I can proudly say that my wife is truly a gem. For me, she is a living example of **"Stree Shakti" - inner strength, resilience, and grace.**

Every success I have today carries her silent sacrifices behind it, and for that, I will always be grateful.

Here's to Vaishnavi - the woman who turned challenges into opportunities and dreams into reality.





Vaishnavi Pawar

Born in Shindi Bk, Amravati. Passionate about cooking, enjoys eating pickles and saunf. Loves badminton, enjoys her "me time," and values simplicity. Quiet by nature, yet deeply loving and respectful.

# UNIQUE HOBBIES
# आगळे वेगळे छंद



# गायन – माझा आवडता छंद

- गौरी विनीत काणे

जगात प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात एखादा ना एखादा छंद असतो. तो छंद त्याला आनंद देतो, आयुष्य समृद्ध करतो आणि मनाला नवी दिशा दाखवतो. माझ्या आयुष्यात अशी विशिष्ट जागा मिळवलेला छंद म्हणजे गायन. गाणं हे माझ्यासाठी केवळ मनोरंजन नाही, तर एक आत्मिक अनुभव आहे. शब्द, स्वर आणि लय यांची संगत जणू माझ्या मनाचे दरवाजे उघडते आणि अंतर्मनाला शांतता देते.

## लहानपणापासून असलेली गाण्याची ओढ

माझ्या घरात नेहमी संगीताची गोड झुळूक वाहत असे. आजोबा भक्तिगीते ऐकत; आईला सुवर्णयुगातील गाणी आवडत, तर वडील कधी शास्त्रीय संगीताचा आस्वाद घेत. घरातील या वातावरणामुळे संगीताची गोडी माझ्या मनात नकळत रुजली. मी लहान असताना टीव्हीवर एखादे गाणे लागले की ते ऐकून त्यासोबत गाण्याचा मी प्रयत्न करत असे. माझा स्वर किती बरोबर आहे हे कधी माहीत नव्हते, पण गाण्यातून मिळणारा आनंद मात्र अमूल्य होता. शाळेत पहिल्यांदा गाण्याच्या स्पर्धेत भाग घेतल्यावर मला मिळालेली दाद माझ्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली.

## गायनाचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम

गायन हा केवळ छंद नाही; तो व्यक्तिमत्त्व घडवण्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. रोजचा रियाज करण्याने माझी एकाग्रता वाढली. स्वर बरोबर लावण्यासाठी लागणारा संयम आणि सातत्य यांनी मला शिस्तीचे धडे दिले. गाण्यातील भाव व्यक्त करण्यासाठी मन आतून हलकं करणं आवश्यक असतं; त्यामुळे आनंद, दुःख, प्रेम किंवा आशा - या प्रत्येक भावनांची ओळख अधिक खोलवर होत गेली. गायनामुळे मी लोकांसमोर आत्मविश्वासाने उभं राहू लागली . सुरुवातीला जरी थोडा संकोच वाटत होता, तरी हळूहळू हा छंद मला धाडस देऊ लागला.

## गायनाची साधना – एक सर्जनशील प्रवास

माझ्या गायनाचा सर्वात प्रिय भाग म्हणजे रियाज. सकाळची शांत वेळ, मंद प्रकाश, वातावरणातील गारवा आणि त्यात हरवून केलेला गाण्याचा सराव - हा अनुभव वर्णनातीत आहे. साध्या-सरळ सरगमपासून ते जटिल आलापांपर्यंत प्रत्येक टप्पा रोमांचक वाटतो. मी विविध प्रकारच्या संगीतशैली शिकण्याचा प्रयत्न केला आहे - भक्तिगीत, सुगम संगीत, भावगीत, गझल, चित्रपटगीत आणि कधी कधी हलके-फुलके पाश्चात्य सूरही. प्रत्येक शैलीचा स्वतःचा एक वेगळा आत्मा असतो आणि त्या आत्म्याला समजून घेण्याचा प्रयत्न केल्यावरच गायनात खरी गोडी येते.

## गायन आणि माझे दैनंदिन आयुष्य

गाणं माझ्या आयुष्याचा ताण कमी करणारा जादुई उपाय आहे. कामाचा दिवस कितीही कठीण गेला तरी संध्याकाळी मी एखादं आवडतं गाणं गुणगुणते आणि क्षणात मन हलकं होतं. कधी कधी मोबाईलवर ॲपच्या मदतीने मी माझा आवाज रेकॉर्ड करुन ऐकते; चुका शोधून दुरुस्त करते . छोट्या कार्यक्रमांत किंवा घरगुती समारंभात गाणे सादर करणे मला विशेष आनंद देते. कधी कधी मित्रांकडून मिळणारी दाद हा माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार असतो.

## गायनातून शिकलेले धडे

गायनाने मला अनेक गोष्टी शिकवल्या:

- सातत्याने प्रयत्न करण्याची शक्ती
- स्वर आणि जीवनातही संतुलन राखण्याची कला
- भावना व्यक्त करण्याचे महत्त्व
- प्रत्येक गाण्यातून एक नवा अनुभव कसा मिळतो
- नम्रता - कारण संगीत ही समुद्रासारखी विशाल कला आहे

## समारोप

माझ्या दृष्टीने गायन हा छंद नसून आनंदाचा, शांततेचा आणि आत्मिक समाधानाचं स्रोत आहे. स्वरांच्या दुनियेत मला माझं स्वतःचं जग सापडलं आहे. भविष्यात संगीताचे अधिक सखोल ज्ञान मिळवण्याची, वाद्य शिकण्याची आणि अनेक सुंदर गाणी सादर करण्याची माझी इच्छा आहे. ही सुरेल वाटचाल आयुष्यभर सुरु राहावी आणि या छंदाने माझ्या मनात वसवलेली ओढ अशीच कायम टिकून राहावी - हीच माझी संगीताविषयीची खरी प्रार्थना.

## गायन या माझ्या छंदावर मी केलेली छोटीशी कविता

स्वरांच्या नभात मी उडत जाते
गायन हे माझं श्वासाचं गीत
भावनांच्या लाटांवर मऊसं नचित

लहानपणी अंगणात बसता,
वाऱ्याच्या झुळुकीत सूर नाचता,
ढगांशी बोलत, पक्ष्यांशी गात,
छोट्या स्वप्नांना पंख फुटत जात.

तानपुऱ्याच्या मंद गुंजनात,
मन हरवते लयांच्या ढालनात;
प्रत्येक स्वर जणू नवं उमललेलं फूल,
आतल्या आकाशात घुमतं त्याचं गूढ कूल.

कधी स्वर जुळतात, कधी तुटतात,
कधी गाण्याचे रस्ते अचानक वळतात;
पण त्या वळणांमध्येही असते जादू,
साधनेतूनच जुळते सुरांची मऊ सी कादू.

आनंदाच्या क्षणी गाते सूर्यकिरण,
दुःखात गाते शांत चांदण्यांचे मृदु स्पंदन;
गाणं माझ्या हृदयाचं खोल रहस्य,
गाणं माझ्या आत्म्याचं निर्मळ अवकाश्य.

स्वर म्हणजे माझं कोमल मंदिर,
जिथे शब्द विसावतात, भावना होतात निखळ;
या गीतांच्या पायवाटेवर चालता चालता,
मी स्वतःलाच भेटते दर सकाळी नव्याने खळखळता.

या सुरांच्या रस्त्यावर
मी किती दूर जाईन, माहीत नाही.
पण प्रत्येक गाणं गाताना
मी स्वतःकडे एक पाऊल
जास्त जवळ जाते .

आणि म्हणून -
गायन माझा छंद नाही,
ते माझं निःशब्द प्रार्थनास्थान,
माझी भावनांची भाषा,
माझ्या मनातली स्वरांची अनंत ज्योत आहे.



### गौरी विनीत काणे

माझे नाव गौरी विनीत काणे. मी Ratoath, Meath येथे माझ्या छानश्या कुटुंबीयांबरोबर राहते. मूळची मी नागपूरची, माझं सासर पुण्याचं. आम्ही जानेवारी २०२० ला आयर्लंड ला स्थलांतरित झालो. मी Santry, Dublin येथील Advance Therapy Systems या मुलांच्या क्लिनिक मधे गेल्या ५ वर्षांपासून senior occupational therapist पदावर कार्यरत आहे.

मला लहान मुलानं बरोबर काम करायला खूप आवडता. रोज नवा दिवस, नवा बळ, नवी परीक्षा, नवी मजा आणि रोज नव आवाहन.

Nitya FLAVOURS OF SOUTH INDIAN DAILY FOOD
Address: 9Th Floor 802/A, DSL Abacus IT Park, Survey Colony, Industrial Development Area, Uppal, Secunderabad, Hyderabad, India
Website: www.nityafoods.in
Email: info@nityafoods.in
Contact No: +91 6309068222 / +91 630 906 8333

# ओमकार साधना

- सौ स्वाती अभय वडझिरकर

ओम एतध्येवाक्षरम् ब्रह्म, एतध्येवाक्षरम् परम।।
एतध्येवाक्षरम् ज्ञात्वा, योयदिच्छती तस्यतत।।

ओम हे अक्षरच ब्रह्म आहे, श्रेष्ठ (परम) आहे, हे अक्षर जो जाणतो (ज्ञान), त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. आरोग्य- आवाज- वाणीदोष- अध्यात्म- स्मरणशक्ती- एकाग्रता- तणाव मुक्ती इत्यादीसाठी ओम शक्ती नाद- चैतन्य विकास कार्यक्रम.

## ओमकार इति इदम सर्वम्

ओमकार साधनेचा उपयोग आवाज, आरोग्य, ऐहिक तसेच पारमार्थिक उन्नती, अशा अनेक गोष्टींसाठी होतो. वर्तमान धकाधकीच्या जीवनात स्वास्थ्य हरवले आहे. सतत ताण-तणाव येत असतात. मनाची निगा राखण्यासाठी कमीत कमी वेळेत जास्त परिणामकारकपणे, ध्यानधारणा, एकाग्रता, तणावमुक्ती तसेच मन:स्वास्थ्य मिळविण्यासाठी ओंकार साधनेची उपयुक्तता लक्षणीय आहे, असे अनुभवास येते.

वेदांनी, संतांनी, योग्यांनी, निसर्गोपचार, आयुर्वेद, संगीततज्ञ, वाचा तज्ञांनी, आवाज शास्त्रज्ञांनी अशा अनेकांनी ओमकाराचे महत्त्व विषद केले आहे. या साधनेचे सत्वर सुपरिणाम प्राप्त व्हावे यासाठी याचे उच्चारण योग्य पद्धतीने व्हावे असे आग्रही प्रतिपादन सर्वच ठिकाणी केले जाते.

अहिल्यानगरच्या डॉक्टर जयंत करंदीकरांनी प्रेरणा घेऊन ओमकार च्या उच्चारण व उपयुक्ततेवर संशोधन केले. ते स्वतः एमडी मेडिसिन असून हृदयरोगतज्ञ आहेतच, शिवाय संगीत विशार आवाजशास्त्राचे तज्ञ, आकाशवाणी मान्यता प्राप्त गायक, संगीतकारही आहेत डॉक्टर करंदीकरांनी अनेकांच्या आवाजातील वाणीदोष, व्होकल कॉर्डस, पॅरालिसिस, तसेच शारीरिक आरोग्याच्या विविध तक्रारी दूर करण्यासाठी ओमकार साधनेने यशस्वी उपचारही केलेत. उपचार पूर्व व पश्चात स्थिती दाखविणारे रिपोर्ट/ रेकॉर्ड त्यांनी जतन करून ठेवले आहेत.

## ओमकार साधना नियमित केल्याने शरीरात ओमकार स्पंदनांचे प्रवहन लयबद्ध होत असते.

हृदयाच्या स्पंदनांच्या रुपाने ओमकारची लयबद्धता मानवी देहाला व्यापून उरते. या स्पंदनांच्या लयीनेच ज्या पंचमहाभूतांचा हा देह निर्माण झाला त्याची लयबद्धता साधली जाते. पंचमहाभूतां मागील चैतन्य म्हणजे त्यांना गती देणारा ओंकार, या ओमकार स्पंदनरुपी चैतन्याचा समतोल ढासळला, लय ढासळली की माणसाच्या शरीराची लय बिघडते आणि मग हे विविध व्याधींच्या रुपाने मानवाला ग्रासते.

शास्त्रशुद्ध ओमकार साधनेने ओमकार स्पंदनाची लयबद्धता साधते. कमी स्पंदने झालेल्या पंचमहाभौतिक अवयवांमध्ये, साधनेने प्राप्त होणारी स्पंदन शक्ती एकरूप होते, मग स्पंदनांचा समतोल साधून व्यक्ति व्याधीमुक्त होते. देहशुद्धी, मन शुद्धी आणि आत्मशुद्धी होते. इतका सरळ साधा सिद्धांत आहे. ओमकारातून आरोग्याकडे या संकल्पनेचा म्हणूनच म्हणावे लागते ओंकार इति, ईदम, आरोग्यम.

## ओमकार साधनेचा उपयोग

१) आवाज- वाणी दोष, वाचा, स्वर यंत्र बिघाड, स्वरतंतूची शिथिलता इत्यादी.
२) आरोग्य- प्रतिकारशक्ती वाढविणे, रोग निवारण, एक संरक्षक कवच निर्मितीसाठी.
३) ऐहिक पारमार्थिक उन्नतीसाठी- विकासासाठी.
४) एकाग्रता- स्मरणशक्ती, मन:शांती, ध्यानधारणा.
५) तणाव मुक्ती
६) सौंदर्यवर्धन
७) व्यक्तिमत्व विकास या साधनेत खालील सर्व गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्या शास्त्रशुद्ध पद्धतीने आत्मसात करुन सातत्याने दैनंदिन जीवनात करणे आवश्यक आहे.

१) लय बांधणे.
२) उदर श्वसन.
३) प्राणायाम.

## विविध ओमकार प्रकार-

१) त्रिपदी
२) तरंग
३) बीज ओमकार
४) बिंदू
५) नाद
६) शक्ती
७) शांती
८) अनुनासिक ओमकार

९) प्लुत ओमकार
१०) रहस्व ओमकार
११) दीर्घ ओमकार
१२) न्यूख ओमकार
१३) न्यूख न्यूख ओमकार

## चक्र बिजाक्षर ओमकार

१) मुलाधार ओमकार - (मूलापाशी) -
सं शं षं वं ओं

२) स्वाधिष्ठान ओमकार - (नाभीच्या खालचा भाग) -
बं भं मं यं रं लं ओं

३) मणिपूर ओमकार - (नाभी पाशी पोट) -
तं थं दं धं नं पं फं डं ढं णं ओं

४) अनाहत ओमकार - (हृद्याजवळ) -
कं खं गं घं डं चं छं जं झं यं टं ठं ओं

५) विशुद्ध ओमकार - (कंठापाशी) -
अ आ इ ई उ ऊ ऋ ऋ लृ लृ(दीर्घ) ए ऐ ओ औ अं अः ओं

६) आज्ञा ओमकार - (भूमध्याशी)
हं क्षं ओं प्रचंड ताकद आहे.

ओमकार साधना शिकल्यावर, सातत्याने सराव करणे, अत्यंत परिणामकारक आहे. या साधनेत प्रातःकाल सर्वात योग्य वेळ! अन्य वेळी केली तरी चालते, पण पोट रिकामे असावे लागते. पद्मासनात/खुर्चीवर पाठीचा कणा ताठ ठेवून बसावे. ओमकार चे शास्त्रशुद्ध अचूक उच्चारण झाले तरच त्यातून फलप्राप्ती होते.

अ, उ, म मिळून तीन मात्रा व अर्ध चंद्राकार बिंदू ही अर्धी मात्रा मिळून ओमकार हा साडेतीन मात्रांचा एक परम शुद्ध व मूळ अति उत्तम उच्चार आहे. म्हणून ओमकाराला ब्रह्म स्वर म्हटले आहे.

## प्रार्थना

||ओमकार बिंदू संयुक्ता
नित्यम ध्यायंती योगिनः
कामदं मोक्षदं एव
ओमकाराय नमो नमः||



## सौ स्वाती अभय वडझिरकर

मला सुगम संगीत ची मनापासून आवड असल्याने मी संगीताचा वर्ग चालू केला. त्यामध्ये सुरुवातीला श्वासाचे महत्त्व, गाताना समजणे अत्यंत आवश्यक आहे, त्यासाठी माझ्या गुरु सौ विद्याताई कर्वे यांनी मला ओमकार साधनेचे शिक्षण दिले. त्याने श्वासावर नियंत्रण येऊन गाणे उत्तम प्रकारे आत्मसात करता आले. ओमकार साधनेचा वर्ग सातत्याने गाण्याबरोबर चालू ठेवला. त्यातून ओमकार साधनेचे महत्त्व, त्याचे फायदे समजले .मी 2010 पासून नियमितपणे ओमकार साधना दररोज 25 मिनिटे करत आहे. सध्या मी माझ्या मैत्रिणींना, तसेच ज्यांना आवड असेल त्या व्यक्तींना ही साधना विनामूल्य शिकवून त्या साधनेचा प्रसार करत आहे.

TILEX
Locations: Dublin | Cork | Drogheda | Mallow
Contact No: 01 515 3100

# FINE ARTS AND AESTHETICS
# ललित



# मी अस्वस्थ

- अमित सावरगांवकर

काय करावं आता म्हणून मी अस्वस्थ,
अस्वस्थ झालो म्हणून अजून अजून अस्वस्थ...

काहीतरी हललंय, हे मात्र नक्की,
काहीतरी राहिलंय, ही खात्री पक्की,
हललेलं जाणवत नाही म्हणून मी अस्वस्थ,
राहिलेलं मिळत नाही म्हणून अजून अजून अस्वस्थ...

ओळखीचा रस्ता पण अर्धवट पार झालाय,
छातीवर कुठला तरी अलगद वार झालाय
नागमोडी वळणं धोक्याची म्हणून मी अस्वस्थ,
कट्यार नेमकी ओळखीची म्हणून अजून अजून अस्वस्थ...

नक्की झालंय काय, काही कळतंय का?
न पडलेल्या प्रश्नाचं उत्तर मिळतंय का?
प्रश्न पडत नाहीत म्हणून मी अस्वस्थ,
पडले तर कळत नाहीत म्हणून मी अस्वस्थ,
कळलेच तर उत्तर नाही म्हणून मी अस्वस्थ,
मिळालं तर रुचत नाही म्हणून अजून अजून अस्वस्थ...

कसली तंद्री माहिती नाही, उगाच शून्यात वावरती
अवघ्या एका सुरकुतीसाठी, आरश्यात बघायला घाबरती
आतलं... खोल आतलं चुकून काही दिसलं तर?
समोर जे दिसतंय ते, जर खरं नसलं तर?
रोज असणारे तेच केस आज थोडे कमी म्हणून मी अस्वस्थ,
बारीक दिसणारी पांढरी बट म्हणून अजून अजून अस्वस्थ...

विचारांच्या लाटा कपाळावर, मनमोकळा हसत नाही
कोणतीच कला अंगी नाही म्हणून मी अस्वस्थ,
एकटेपणाची तंगी नाही म्हणून मी अस्वस्थ,
सुखाची बेरीज मिळत नाही म्हणून मी अस्वस्थ,
दुःखाची वजाबाकी कळत नाही म्हणून अजून अजून अस्वस्थ...

चिंता सतत भेडसावते, कशाची ते कळत नाही
नुसतं जगण्याच्या मोहापायी, समाधान मिळत नाही...
शेवट चांगला हवा पण, सुरुवात कशी कळत नाही
अंतर्मनाला स्पर्श करणारा, परीस कुठे मिळत नाही...

कोवळ्या उन्हाची गंमत घेताना मी अस्वस्थ,
लख्ख चंद्रप्रकाशात फिरताना सुद्धा अस्वस्थ...
स्वप्नं अजिबात पडत नाहीत म्हणून मी अस्वस्थ,
पडलीच तर पूर्ण होत नाहीत म्हणून अजून अजून अस्वस्थ...

जाऊदे आता थोडा शांत झोपती जाऊन,
बदल नाही घडणार असं उदास राहून,
सगळ्या मिळून दहा दिशा, माझी एखादी कळेलच की,
नित्य मेहनत करता करता, संधी सुद्धा मिळेलच की...

कुढणं जरा बाजूला सारुन, थोडं मनापासून जगती
स्वतःवर जरा प्रेम करून, माझं समाधानही शोधती...
उद्यापासून काय करावं म्हणून मी अस्वस्थ,
काहीतरी घडवायचं आता म्हणून मी अस्वस्थ,

आता अस्वस्थ झालोच आहे, तर कशाला बसू स्वस्थ,
असाच पाठीशी रहा देवा, होउदे मला अजून अजून अस्वस्थ...



## अमित सावरगांवकर

अमित एक मनस्वी कवी आणि अभिनेता असून अनेक नाट्यप्रयोग आणि लघुपटांचा निर्माता सुद्धा आहे. अमितने हिंदी आणि मराठी चित्रपटांमध्ये तसेच वेब सिरीजमध्ये अभिनय केला आहे. जीवनातला प्रत्येक क्षण काहीतरी शिकवती, जो साध्या सोप्या शब्दांमध्ये गुंफण्याचा आणि काव्यनाटयरुपात सहज पद्धतीने सादर करण्याचा अमितचा नेहमीच प्रयत्न असती.

पुणे ते डब्लिन प्रवास केल्यानंतर अमितने आयर्लंडमध्ये "कट्टा कविता", "कट्टा आणि बरंच काही", "गुलजार अनप्लग्ड" आणि "कभी कभी मेरे दिल मे" ह्यासारख्या इमॅगो व्हाइब्स मीडियाच्या अनेक नवनिर्मित कलाकृतींमध्ये संकल्पना, निर्मितीपासून ते अभिनयापर्यंत सहभाग घेतला आहे.

# शुभ्रा

काल कामाच्या लगबगीत असताना एक अप्रूप घडलं... रस्त्यावर एका दृष्यानी लक्ष्य वेधलं नि खिळवून धरलं..

समोरच्या घराच्या भिंतीला बिलगून ती उभी होती.. बिनधास्त, स्वतःच्याच मस्तीत जगाकडे बघत... नुकतीच वयात आलेली, मोहोरलेली, एका कटाक्षात भूल पाडणारी. तिच्या रुपाला पाहून काळजाला ठेच लागली नि एक सुस्कारा नकळत बाहेर पडला...

येणारे जाणारे तिला बघून एक क्षण नक्कीच थबकत होते, डोळे भरुन कौतुकाने पाहत होते आणि प्रशंसेच एक स्मित ओठावर खेळवत परत आपल्या कामाला जात होते.

पण हे सगळं तिच्या गावीही नव्हतं. ती आपल्या स्वतःच्या अस्तित्वाचा, उमलण्याचा, वयात येण्याचा उत्सव मनसोक्त साजरा करत होती, आणि ती सुद्धा अत्यंत संयमितपणे, स्वतः बरोबरच. बरं, तिनी काही भडक कपडे घातले होते किंवा विचित्र हावभाव करत होती का, तर तसही नव्हतं... स्वतःच नेसूच विमल वस्त्र तिनी अगदी सहजपणे स्वतःभोवती लपेटून सावरुन धरलं होतं.

पण तिचा तोच स्वतःच्या फुलून येण्याबद्दलचा आनंद आणि डोळस अभिमान सगळ्यांना तिच्याकडे नकळत आकर्षून घेत होता, काळजाला ठेच लावत होता, तिच्या प्रेमात पाडत होता...

आजही आहे ती उभी त्याच ठिकाणी, तशीच... रसरसलेली, स्वतःवरच प्रचंड खुष होऊन, एका अनामिक मस्तीत जगाकडे बघत...

शुभ्र फुलानी बहरलेली, डवरलेली, देखणी...

शुभ्रा

- गायत्री साठे

# लावण्या

कुठल्यातरी अनामिकाच्या ओढीने भरलेल्या सावळ गंधित अवकाशमंचावर ती प्रवेशली, तीच मुळी झपाटणाऱ्या आवेगात. नजरही ठरु न देता थिरकणारी तिची पावलं पदन्यास तात्पुरता संपवून जेव्हा विंगेशी थबकली, तेव्हा त्या शांत अर्धविरामात तिला साथ देण्यासाठी उपस्थित वाद्य खडबडून जागी झाली. ढोल ताशांचा आवाज कल्लोळुन उठला तो तिच्या नाचण्याची सम कुठच्याकुठे बाजूला टाकून.

आणि मग एक चक्रच चालू झालं... ती अचंबित करणाऱ्या चपळाईने रंगावकाशात यायची, बेधुंद पदन्यासाने उपस्थित सर्वांना भान विसरायला लावायची आणि विंगेशी जरा विसावायची... ती विसावली की त्यानंतर साथीच्या ढोल-ताशांचा कल्लोळ व्हायचा...

तिच्या त्या गारुड करणाऱ्या नृत्यात प्रेक्षक इतके गुंगून गेले होते, की त्यांना वाद्यांच्या कल्लोळाचं, पळा-पळाने अजूनच अंधारणाऱ्या अवकाशाचं, तिच्या पायतळी चमचमणाऱ्या हिरकणी सोनसळी झिलईचं, कसलं कसलं म्हणून भान उरलं नव्हतं...

सजीव-निर्जीव, मनुष्य-प्राणी-पक्षी, डोंगर, समुद्र, वारा, लाटा, नव्हे सारं विश्वच मंतरुन टाकणारी अशीच तर होती ती... जंतरलेली. स्वतःच्याच नृत्यात धुंद. तिला एकटीलाच ऐकू येणाऱ्या तालावर मत्त झुलणारी. झटका देणाऱ्या लावण्याने लखलखणारी. काउंटी क्लेअरच्या किनाऱ्याजवळ, समुद्राच्या पाण्यावर कडाडणारी तडिता..

अतुलनीय अशी...

लावण्या!

Cadence Ethnic Wear
Address: 51 Waterfall Heights, Bishopstown, co Cork.
Email: chopra.neetu5@gmail.com
Phone: +353 83 022 5222

# हेमांग

रोजच्या यायच्या जायच्या रस्त्याच्या कडेला तो उभा दिसायचा. त्याच्या एका दर्शनाने मन लगेच ताजं व्हायचं. तरुण तुकतुकीत असा तो, रोजच हिरव्या - करड्या कपड्यात दिसत असला; तरी त्याच्या एकंदर व्यक्तिमत्वात लांबूनही छाप टाकणारा सोनसळी उत्साह होता. रोजच्या वाटेवर ठरलेल्या जागी, ठरल्या वेळी मिळणारा हा एनर्जी शॉट चांगलाच सवयीचा झाला होता.

एक दिवस अचानक तो जरा वेगळाच वाटला. थोडासा त्रासलेला. त्याच्या भवतालचा वारा जरा बोचत असावा बहुतेक त्याला. आज त्याच्या नेहेमीच्या टवटवीत कपड्यात जरा रंग गेल्यासारखे पिवळे डाग आहेत असा भास झाला. नीट बघता येण्याआधीच रहदारी चालू झाली आणि तो नजरे आड झाला.

त्यानंतर सुट्ट्या होत्या, त्यामुळे त्या रस्त्याने जाणं झालं नाही आणि थोडीशी हुरहूर लागली. परत रोजचं रहाटगाडगं चालू झालं, तेव्हा त्याला बघायची वेगळीच ओढ लागली होती. नेहेमीच्या ठिकाणी रहदारी थबकल्यावर त्याच्याकडे नजर वळली आणि त्याचा रुपडं पाहून मोठ्ठा धक्का बसला. 'आ' वासला गेला, डोळे मोठे झाले, चमकून उठले. त्याचे हिरवे करडे कपडे कुठेच नव्हते! तो तर सळसळत होता सोनेरी-पिवळ्या, थोड्या काळपट पेहेरावात. आधी ताजातवाना तो आज लखलखत होता त्याच्या आतल्या देखणेपणानी. बोचणाऱ्या वाऱ्याला कवेत घेऊन त्याने स्वतःला अंतर्बाह्य बदलून घेतलं होतं. तेही स्वतःचा स्वत्व न सोडता. त्याच्या या ताकदीने अजूनच ताठ झालेला तो, आता कुठल्याही परिस्थितीत रोवून उभा राहणार होता. पानगळीच्या शेवटी त्याचा फक्त खराटा उरणार होता तरीही! वसंताच्या यथावकाश होणाऱ्या आगमनावर अटळ विश्वास असलेला तो वृक्ष, त्याच्या सोन्याच्या झळाळीने लोकांना दिपवून टाकत होता...


स्वतःच सोन्याचं रुप आणि अंतरंग सार्थ करत होता..

तो हेमांग...

- गायत्री साठे

# बिलोर

मराठी कवींतील एक अध्वर्यू, कवियित्री शांताबाई शेळके म्हणतात, तसा माझाही लहानपणचा लोलक हरवलाच होता कधीतरी. अजूनही परत नाही मिळालाय, पण असंच ध्यानीमनी नसताना तो अचानक डोळ्यांसमोर तरळून जातो. त्या तेवढ्या काही क्षणांसाठी गवत, आभाळ, वारा, फुलं - सारं सारं आतल्या प्रकाशानी चमचमताना दिसतं आणि इंद्रधनुषी माणसांच्या छटा त्या प्रकाशात मिसळतात. लोलक अलगद स्वतःभोवती गिरकी घेतो आणि त्याच्या बिलोरी अंतरंगात उमटलेली प्रतिबिंब कायमची मनावर ठसून जातात. जसे शुभ्रा, लावण्या आणि हेमांग...



## गायत्री साठे

गायत्री साठे या गेली ८ वर्षे डब्लिन मध्ये राहत असून त्यांचे लिखाण कोविड काळात सुरु झाले. लहानपणापासून घरात आणि शाळेत झालेले उत्तम वाचनाचे, भाषेचे संस्कार त्या काळातील विषादात उफाळून वर आले आणि त्यांना आनंदाचा एक अंतःस्रोत सापडला. शिक्षण - व्यवसायाने युझर एक्सपेरियन्स डिसाईनर असलेल्या गायत्री यांना पेंटिंग्ज, कला-कुसरीच्या वस्तू करायला तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यायलासुद्धा आवडते.

Spice India
Fine Indian Cuisine
Locations: Stoneybatter | Blanchardstown | Athlone | Mullingar | Carrick on Shannon | Galway | Longford
Email: info@spiceindia.ie


STORIES OF INTEGRATION
समावेश कथा

# Ella Never Gives up!

- Mishka Chalikwar

Once upon a time, there was a girl named Ella who loved doing gymnastics. She enjoyed flipping, stretching, and practising new moves every day. Gymnastics made her feel strong, flexible, and confident.

Every Saturday, Ella goes to her gymnastics class, where she practices her favourite moves. Her favourite move was handstands, and she practised it everywhere in the living room, in the garden, even in the hallway when no one was watching. Ella was practising very hard for her upcoming gymnastics competition.

One sunny afternoon, while practising a handstand in her room, she lost her balance, fell, and twisted her ankle. Tears filled her eyes. It hurt a lot, and she felt worried. The big competition was only a few days away.

But Ella and her family didn't lose hope. They stayed positive and worked closely with her doctor and physiotherapist to help her recover as quickly as possible. The doctor told her she needed to wear a cast for a while.

Although Ella was disappointed, she believed she could get better in time. Her physiotherapist helped her to do small exercises each day, and her mom made sure she ate healthy food to help her heal fast.




Ella tried her best to stay patient and keep smiling, even when it was hard. Slowly, her ankle began to heal, and she started to feel stronger each day.

Finally, the day of the competition arrived. Ella took a deep breath and gave it everything she had. She moved gracefully, performed beautifully, and didn't let anything stop her.

When the results were announced, Ella couldn't believe her ears. She had won first place. Her family jumped from their seats. Her coach hugged her. Ella felt her heart filled with joy, pride, and strength.

And from that day on, she always remembered never to give up, no matter what challenges come your way.



Mishka Chalikwar

Mishka, a 7-year-old, has a deep love for reading. So far, she has already read more than 500 books. Inspired by the many adventures she has discovered in those pages, Mishka has recently begun writing her own stories.

This is her very first story, and she is excited to share it with the Marathi Mandal Ireland community.

We invite everyone in the community to read Mishka's story, reflect on its message, and share your feedback. Your encouragement will help Mishka grow as a writer and continue her journey of storytelling.

# परदेशात शिक्षणाची सुवर्णसंधी:
## महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती आणि माझा अनुभव

- ईशान भिसे

परदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थ्यांच्या मनात असते, पण त्या स्वप्नाला वास्तवात आणण्यासाठी आर्थिक तसेच योग्य मार्गदर्शनाची गरज असते. महाराष्ट्र शासनाच्या "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेने हे स्वप्न हजारो विद्यार्थ्यांसाठी साकार करण्याचा मार्ग खुला केला आहे.

मी, ईशान भीसे, वय २२, सप्टेंबर २०२४ साली या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन University College Dublin, आयर्लंड येथे माझ्या पदव्युत्तर शिक्षणासाठी दाखल झालो. शासनाच्या मदतीने माझा परदेशी शिक्षणाचा प्रवास शक्य झाला आणि या अनुभवाने मला केवळ जागतिक शिक्षणच नव्हे, तर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचा अभिमानही दिला.

### योजनेची पार्श्वभूमी

ही योजना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे २०१८ पासून राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत QS (Quacquarelli Symonds) किंवा THE (Times Higher Education) वर्ल्ड रँकिंगच्या पहिल्या २०० विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना शासन शिष्यवृत्ती देते. २०२४–२५ या वर्षासाठी ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे, त्यापैकी ३० पदव्युत्तर (Postgraduate/Diploma) आणि १० डॉक्टरेट (Ph.D.) विद्यार्थ्यांसाठी आहेत.

### पात्रता निकष

- उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी आणि भारतीय नागरिक असावा.
- उमेदवाराला QS रँकिंगच्या पहिल्या २०० मध्ये असलेल्या परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळालेला असावा.
- वयोमर्यादा: पदव्युत्तर अभ्यासासाठी ३५ वर्षे, पीएच.डी. साठी ४० वर्षे.
- भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान ५५% गुणांसह पदवी/पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असावी.
- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखांपेक्षा कमी असावे.
- पूर्वी कोणत्याही शासनाच्या परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा

### शिष्यवृत्तीचे लाभ

या योजनेत विद्यार्थ्यांना पुढील सर्वसमावेशक आर्थिक सहाय्य मिळते:

- परदेशातील विद्यापीठाने आकारलेली पूर्ण शिक्षण फी (Tuition Fee),
- निवास आणि भोजनासाठी मासिक भत्ता (Subsistence Allowance),
- इकोनॉमी क्लास विमानभाडे (Airfare) – भारतातून परदेश आणि परत,
- आरोग्य विमा (Health Insurance),
- अकस्मिक निधी (Contingency Fund), पुस्तके, स्टेशनरी, संशोधन अहवाल व इतर खर्चासाठी दरवर्षी सुमारे ११०० GBP (UK साठी) किंवा १५०० USD (इतर देशांसाठी)
- या सर्वांमुळे विद्यार्थी निश्चिंतपणे शिक्षण, संशोधन आणि सांस्कृतिक अनुभवावर लक्ष केंद्रित करू शकतात.

### अर्ज प्रक्रिया

अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आहे. इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे, प्रवेशपत्र (Unconditional Offer Letter), गुणपत्रिका, पासपोर्ट, उत्पन्नाचा दाखला, व आवश्यक परीक्षांचे (IELTS/GRE/TOEFL) निकाल, अपलोड करणे आवश्यक आहे.

अर्ज भरल्यानंतर जवळच्या विभागीय कार्यालयात मूळ कागदपत्रांची पडताळणी करावी लागते. अपूर्ण किंवा उशिरा आलेले अर्ज विचारात घेतले जात नाहीत.

### माझे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी

या शिष्यवृत्तीमुळे मला जागतिक शिक्षणाचा दरवाजा उघडला. मी इच्छितो की महाराष्ट्रातील प्रत्येक पात्र विद्यार्थ्याने या संधीचा लाभ घ्यावा.

- वेळेत अर्ज करा आणि सर्व मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक वाचा.
- योग्य तयारी करा, प्रवेश परीक्षा, कागदपत्रे, आणि वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे.
- शिक्षण पूर्ण करून आपल्या राज्यासाठी योगदान देण्याची जबाबदारीही पाळा; ही शिष्यवृत्ती केवळ आर्थिक मदत नसून सामाजिक बांधिलकी आहे.

## संपर्क


या शिष्यवृत्तीबद्दल अधिक मार्गदर्शन किंवा शंका निरसनासाठी विद्यार्थी माझ्याशी संपर्क साधू शकतात:

ई-मेल: ishanbhise09@icloud.com
फोन: +91 94226 56138

## शेवटचा विचार

महाराष्ट्र शासनाची ही योजना जागतिक दर्जाचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अमूल्य संधी आहे. योग्य नियोजन, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर तुम्हीही हे स्वप्न साकार करू शकता.

आपल्या राज्याचा अभिमान वाढवणारा पुढचा विद्यार्थी तुम्हीही होऊ शकता, फक्त पहिले पाऊल उचला!



ईशान भिसे

मी सध्या आयर्लंडमधील University College Dublin येथे Artificial Intelligence (Human–Computer Interaction) या विषयात संशोधनात्मक पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. यापूर्वी MSc Computer Science (Negotiated Learning) पूर्ण केले.
२०२४ साली महाराष्ट्र शासनाच्या परदेशी शिष्यवृत्तीमुळे माझ्या शिक्षणाला नवी दिशा मिळाली. तंत्रज्ञान, माणूस आणि विचार यांमधील संवाद शोधत राहणे, हाच माझ्या अभ्यासाचा आणि लेखनाचा प्रवास आहे.

ASIAN Financial
Address: 1st Floor, Unit 38, Dunboyne Business Park, Dunboyne, Co, Meath, A86 YP08.
Website: www.asianfinancial.ie
Email: kanwar@asianfinancial.ie

# एमराल्ड लँड ते माझी माती, माझी माणसं

- धनश्री दामले-लिमये

परिचय

म्हणतात ना की “जग कितीही मोठं असलं, तरी आपली माती खुणावतेच”, असचं काहीसं डॉ. दिलीप जोंधळे ह्या एका उत्तम, पारंगत आणि दिलदार व्यक्तिमत्वा विषयी म्हणता येईल.

आयर्लंडमध्ये वैद्यकीय क्षेत्रात थोडी थोडकी नाही तर ३५ वर्षे सेवेत राहून, आपल्या मातीची जाण ठेवत, INDO - IRISH Hospital ह्या मल्टि स्पेशालिटी रुग्णालयाचा पाया भक्कम करणारे डॉ. दिलीप जोंधळे, आज आयर्लंड मधील आणि जगभरातील मराठी समुदायासाठी प्रेरणेचा स्रोत आहेत.

त्यांचे बालपण, शिक्षण, परदेशातील अनुभव आणि पुन्हा आपल्या मातीत काम करताना येणारे अनुभव; म्हणजे ध्येय ठरवले तर ते पूर्ण होऊ शकते पर्यंतचा प्रवासच आहे.

विशेष मुलाखत

३५ वर्षे आयर्लंडमधील वैद्यकीय सेवा ते अहिल्यानगर येथे इंडो आयरिश हॉस्पिटल पर्यंतचा डॉ. दिलीप जोंधळे यांचा प्रवास; ह्या विषयी आपण त्यांना एका मुलाखतीद्वारे बोलतं करण्याचा प्रयत्न केला आहे.

१.
नमस्कार डॉक्टर. आज तुमच्याशी संवाद साधताना फार आनंद होत आहे आणि आमची उत्सुकता देखील वाढली आहे तुमच्या प्रवासाबद्दल. सुरुवात करताना, सर्वप्रथम, तुमचे गाव, बालपण, आणि वैद्यकीय शिक्षणाबद्दल सांगा.

डॉ. जोंधळे:
माझा जन्म १९५९ मध्ये अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्ह्यात झाला. वयाच्या नवव्या वर्षी मला सरकारी शिष्यवृत्ती मिळाली. नाशिकच्या शासकीय विद्या निकेतन मधून ५ वी ते ११ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलं. यानंतर प्रवरा कॉलेजमध्ये तेव्हाची ११ - १२ वी पूर्ण केली. त्या नंतर वैद्यकीय क्षेत्रात जायची इच्छा असल्याने, १९७७ मध्ये बी.जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथे एम. बी. बी. एस ला प्रवेश मिळाला. १९८५ पर्यंत एम.डी. मेडिसिन पूर्ण करुन, बॉम्बेमध्ये (मुंबईत), कामाचा अनुभव घेऊन, नवीन आणि आधुनिक वैद्यकीय पद्धती समजून घेण्यासाठी परदेशात जाण्याचा निर्णय घेतला.

२.
३५ वर्षांपूर्वी आयर्लंडचीच निवड का केली? तेव्हा तर भारतीयांची संख्या ईथे बोटांवर मोजण्या इतकी पण नसेल...

डॉ. जोंधळे:
सुरुवातीला अगदी साधा विचार होता की, थोडे वर्ष परदेशातील कार्यपद्धतीचा अनुभव घेऊन अहिल्यानगर परत जायचे. पण आयर्लंड निवडण्याची कारणे म्हणशील तर, एक म्हणजे हा इंग्रजी बोलणारा देश, भारतासारखीच ब्रिटिश- आधारित वैद्यकीय पद्धत, आणि माझे काही मित्र तिथे आधीपासून कार्यरत होते. त्यामुळे १९८९ मध्ये संधी मिळताच मी आयर्लंडमध्ये जाण्याचा निर्णय पक्का केला आणि मग पुढचा प्रवास सुरु झाला.



३.
आयर्लंडमध्ये गेल्यावर सुरुवातीला, तिथल्या कामाची पद्धत, वातावरण आणि संस्कृतीशी कसे जुळवून घेतले?

डॉ. जोंधळे:
आपल्या कडचे वैद्यकीय शिक्षण आणि कार्य पद्धती साधारण सारखीच असल्यामुळे जुळवून घेणं तसं कठीण गेलं नाही. एक फरक असा जाणवला की, तिथल्या नर्सेस खूप जबाबदाऱ्या हाताळत असत, आणि विशेष म्हणजे मुख्य निर्णय प्रक्रियेत देखील सहभागी होत असत. मी कनिष्ठ डॉक्टर (ज्युनिअर मेडिकल प्रोफेशनल) ह्या पदावर रुजू झालो आणि नंतर Membership of the Royal College of Physicians of Ireland (MRCPI) ची परीक्षा देखील उत्तमरित्या पार पडली.

तेव्हा मी सल्लागार झाल्यानंतर आता MRCPI चा परीक्षक देखील आहे. आम्ही इथले सिम्बायोसिस आणि आयर्लंडच्या रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन यांच्या संलग्नतेने काही योजना आखत आहोत. अशा रीतीने पुढचा टप्पा पूर्ण केला. तेव्हा तिथे असणाऱ्या स्थानिक डॉक्टरांचा मला खूपच मोठा आधार होता. त्यामुळे पुढे समोर येणाऱ्या अनेक प्रसंगांना तोंड देणे हळूहळू सोपं झालं.

४.
परदेशात डॉक्टर म्हणून काम करत असताना आणि घरी आल्यावर एक कुटुंब वत्सल मनुष्य ह्यामध्ये समतोल कसा साधलात?

डॉ. जोंधळे:
खरं सांगायचं तर, तेव्हा आयर्लंडमध्ये कामाचे तास ९ ते ५ असे होते, त्यामुळे घर आणि काम ह्यामध्ये समतोल राखणं त्यामानाने सोपं गेलं.

सुरुवातीच्या काही वर्षांत सलग हॉस्पिटलमध्ये राहावं लागायचं, त्या वेळेस खरी कसरत होती. पण, माझी पत्नीही डॉक्टर असल्याने आणि तिच्या भक्कम आधारामुळे बऱ्याच गोष्टी सोप्या झाल्या. तिच्या समजून घेण्यामुळे तितकी अडचण आली नाही. १९९१ पर्यंत मुले नव्हती, त्यामुळे त्या काळात फार अडचण आली नाही. पण, मुलांच्या जन्मानंतर देखील, माझ्या पत्नीच्या अनमोल सहकार्यामुळे मुलांचे संगोपन आणि काम ह्यांचा समतोल सहजरीत्या साधता आला.

५.
तुम्ही परदेशात राहत असताना, मुलांना दोन्ही संस्कृतींचे मूल्य आणि महत्व पटवून कसे दिले? हे ऐकायला जरूर आवडेल. कारण आज इथे आलेली अनेक पालक मंडळी काहीवेळा ह्या दोन्ही गोष्टींमुळे गोंधळलेली दिसतात. त्यांच्यासाठी हे जाणून घेणं खुपचं महत्वाचं ठरेल.

डॉ. जोंधळे:
खरं बोललीस, आमचं खूप सोपं गणित होतं तेव्हा. आमच्या दोन्ही मुलांचा जन्म १९९१ आणि १९९४ मध्ये झाला. जसं त्यांना समजायला लागलं तेव्हा पासूनच आम्ही ठरवलं होतं की घरात बोलताना मराठीतच बोलायचे.

घरच्या बाहेर गेल्यावर आयरिश संस्कृती, राहणीमान आणि इंग्रजी भाषा मुलं तशीही अनुभवणारच होती, त्यामुळे मुलांनी इंग्रजी भाषेत जरी प्रश्न विचारला तरी आम्ही मराठीतच उत्तर द्यायचो. सुरुवातीला त्यांना अवघड गेलं पण नंतर सवय लागून गेली. आज त्यांना ह्या गोष्टींचं महत्व कळत आहे.

आम्ही सकाळचे जेवण कायम आयरिश पद्धतीचे करायचो आणि रात्रीचे भारतीय पद्धतीचं. आजही आम्ही तेच पाळत आहोत. आम्ही मुलांना कायम “ग्लोबल नागरिक” म्हणूनच वाढवलं. म्हणजेच तुम्ही भारतीयही आहात आणि आयरिशही.

६.
अहिल्यानगरमध्ये (अहमदनगर) रुग्णालय सुरु करण्यामागे तुमची प्रेरणा काय होती?

डॉ. जोंधळे:
खरं तर, बालपणापासून शिष्यवृत्तीवर शिक्षण घेताना हळूहळू समाजाप्रती कृतज्ञतेची भावना दृढ होत गेली. आम्ही ९० च्या दशकात परत आलो होतो. तेव्हाच हॉस्पिटलसाठी जागा घेऊन ठेवली होती, पण काही कारणामुळे तेव्हा शक्य झालं नाही. त्यामुळे पुन्हा आयर्लंडमध्ये परतावं लागलं. एक मात्र परत जाताना ठरवलं की एक दिवस परत येऊन बहुविशेषता (मल्टीस्पेशालिटी) रुग्णालय उभारायचे.




सुरुवातीला काही आर्थिक मर्यादा आल्या, काही अचानक उभ्या राहिलेल्या अडचणी होत्याच, पण प्रत्येक गोष्टीची वेळ असते. ती वेळ आली, आमच्या INDO IRISH HOSPITAL च्या उद्घाटनाला माननीय नामदार श्री. गडकरीजी आले होते. केवळ आमच्या आणि त्यांच्या मधील असलेल्या समाजसेवा ह्या समान धाग्यामुळे. आज हे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यासाठी आयर्लंड मधील माझ्या कामाचा मला खूप उपयोग आणि फायदा झाला.

७.
अहिल्यानगरला परत आल्यावर तुम्हाला वेगळे काही अनुभव आले का?

डॉ. जोंधळे:
खरं सांगायचं तर मला वैयक्तिकदृष्ट्या फारसा बदल जाणवला नाही. कारण जसं मी आधी म्हणालो मुलांना दोन्ही संस्कृतींचा मागोवा देण्याच्या दृष्टीने आम्ही, दरवर्षी दिवाळीसाठी तेव्हाच्या अहमदनगरला यायचो. कुटुंबियां सोबत आपला सण साजरा करायचो. आमचे स्वतःचे घरही आहे त्यामुळे तसा फरक खूप जाणवला नाही.

मात्र व्यावसायिकदृष्ट्या फरक मोठा फरक जाणवला. तो म्हणजे आयर्लंडची कार्यपद्धती ‘मूल्याधारित उपचारांवर’ आहे आणि भारतात उपचार करायचे म्हणजे बऱ्याचदा खर्च हा पहिला प्रश्न येतो. हा विचार लक्षात घेऊन आम्ही समाजाप्रती जाण म्हणून आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या रुग्णांकरता अनेक सरकारी योजना आणि विमा सुविधा रुग्णालयात आणल्या. जेणेकरुन गरीबांना उपचार मिळू शकतील आणि त्यांच्या वरील आर्थिक भार हलका होईल. माझे अनेक सहकारी देखील ह्याकरता उत्तम साथ देत आहेत.

तसं मी अजूनही भारतीय प्रणालीशी जुळवून घेत आहे. अनेक गोष्टी नव्याने शिकत आहे.




८.
तुमच्या ह्या संपूर्ण प्रवासातील लक्षात राहिलेला अनुभव असेलच. तीही आम्हाला ऐकायला आवडेल.

डॉ. जोंधळे:
नक्कीच. मला आयर्लंडमध्ये सुदैवाने सरकारी आणि प्रायव्हेट अशा दोन्ही प्रकारांमध्ये काम करायला मिळालं. मी नशिबवान समजतो की माझ्या वैद्यकीय क्षेत्रामुळे अनेक प्रकारचे लोक जोडले गेले. दरम्यान, आयर्लंडमध्ये ३५ वर्षे काम करताना, आम्ही वृद्धांसाठी आयर्लंड मधील पहिले “purpose-built nursing home” सुरु केले - जे आज जगमान्य दर्जाचे गणले जाते. आयर्लंडमधील ज्या हॉस्पिटलमध्ये मी कार्यरत होतो, त्या ठिकाणी भारतीय नर्सेसची भरती प्रथमच माझ्या पुढाकाराने करण्यात आली

ह्या सगळ्या अनुभवांचा फायदा मला अहिल्यानगरमध्ये आधुनिक, दर्जेदार सुविधांयुक्त हॉस्पिटल उभारण्यासाठी झाला. ह्या हॉस्पिटलमध्ये मी समाजाप्रती जाणीव म्हणून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना मदत म्हणून खर्चाच्या रकमेत काही प्रमाणात सूट दिली जाते. त्यांच्या करता वैद्यकीय दृष्ट्या असलेल्या अनेक सरकारी योजनाचा लाभ घेता येऊन उपचार कसे लवकर होतील ह्याची काळजी घेतली जाते. आज गरीब रुग्णांना उपचार देताना मिळालेलं समाधान हेच माझ्या आजवरच्या प्रवासातील सर्वात मोठं यश आहे. एका माणसाला ह्या पेक्षा अजून काय हवं असतं. बरोबर ना!

## समारोप

नक्कीच डॉक्टर. तुमचा प्रवास आयर्लंडमध्ये जाऊन भविष्य घडवू पाहणाऱ्या प्रत्येकासाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. ज्ञान, अनुभव आणि समाजसेवा यांचा योग्य संगम कसा घडवून आणू शकतो, ह्याचं अजून उत्तम उदाहरण कोणतं असू शकेल...

आयर्लंडमधील अनुभव घेऊन, आपल्या शहरात उभारलेले INDO - IRISH Hospital फक्त रुग्णालय नाही - तर त्यांच्या ध्येयाचे प्रतीक आहे.

मराठी समुदायासाठी, विशेषतः आयर्लंडमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी, हा प्रवास एक अमूल्य संदेश देतो की: “स्वप्न पहा, ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न करा, आणि आपल्या मातीत परतत, आपल्या लोकांसाठी काहीतरी करा कारण आपण आपल्या समाजाचं काहीतरी देणं लागतो.”

शब्दांकन,
धनश्री दामले-लिमये



डॉ. दिलीप जोंधळे

aspora
Address: 141 Curtain Rd, London EC2A 3BX, United Kingdom
Website: www.aspora.com
Email: help@aspora.com

# लॉघ्रे पासून जागतिक मंचापर्यंतचा प्रवास

- शार्वी रणदिवे

माझ्या आयुष्यातील सर्वात प्रेरणादायी अनुभवांपैकी एक म्हणजे STEM Racing supported by Formula One या जागतिक STEM स्पर्धेत सहभागी होणे - ज्याला पूर्वी F1 in Schools म्हणून ओळखलं जात होतं.

(STEM - Science, Technology, Engineering, Maths) ही स्पर्धा फक्त रेसिंगबद्दल नाही; तर ही भविष्यातील तंत्रज्ञान आणि व्यवसायाची शिकवण आहे. या स्पर्धेत विद्यार्थी CAD/CAM software वापरुन मिनिएचर Formula 1 कार डिझाइन, उत्पादन आणि रेस करतात. याशिवाय, प्रत्येक टीमने स्वतःचा ब्रँड तयार करणे, स्वतःचं funding उभं करणे, pit display डिझाइन करणे, आणि संपूर्ण marketing strategy विकसित करणे आवश्यक असतं. वेग, डिझाइन, टीमवर्क, नवकल्पना आणि बिझनेस - या सर्व घटकांमध्ये एकत्र चमक दाखवणं फार महत्त्वाचं असतं.




## टीमची निवड आणि आमचा अभिमान

St. Brigid's College मध्ये टीम निवडण्यासाठी एक औपचारिक interview process आयोजित करण्यात आला. या मुलाखतीत विद्यार्थ्यांना STEM मधील रस, नेतृत्व कौशल्ये, आणि प्रोजेक्टसाठी असलेली वचनबद्धता दाखवावी लागत होती.

या प्रक्रियेतूनच आमची संपूर्ण मुलींची टीम निवडली गेली - आणि आम्हाला अभिमान आहे की आम्ही आयर्लंडमधील जागतिक स्तरावरची पहिली सर्व - मुलींची आयरिश STEM Racing टीम होती. आमच्याकडे विविध भूमिका होत्या;

.

माझी भूमिका होती Marketing Manager - जिथे मी sponsorships, ब्रँडिंग, सोशल मीडिया आणि मार्केटिंगची संपूर्ण जबाबदारी सांभाळली. आम्ही एकसंघपणे काम केलं, एकमेकींना साथ दिली, आणि जगाला दाखवलं की मुलीही तंत्रज्ञान आणि नवकल्पनेच्या क्षेत्रात मोठी उंची गाठू शकतात.

## सहयोग, यश आणि जागतिक मंचावरची कामगिरी

राष्ट्रीय स्तरावर झालेल्या STEM Racing National Finals मध्ये आम्ही आमची कार, डिझाइन आणि संपूर्ण प्रोजेक्ट सादर केला आणि सर्वोत्तम ३ टीम्समध्ये स्थान मिळवलं.

यामुळेच आम्हाला Singapore 2025 World Finals साठी आयर्लंडचं प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली - आणि तो क्षण आमच्यासाठी स्वप्न साकार झाल्यासारखा होता

परंतु, World Finals मध्ये सहभागी होण्यासाठी प्रवास, उपकरणं, निवास, आणि स्पर्धेचे शुल्क यांसाठी मोठी आर्थिक गुंतवणूक आवश्यक होती - आणि आमच्याकडे त्यासाठी लागणारा निधी तयार नव्हता. निधी उभारणं हेच सर्वात मोठं आव्हान होतं. आम्ही शाळा, स्थानिक व्यवसाय, औद्योगिक कंपन्या आणि समुदायांसमोर सादरीकरणं केली. कधी सकारात्मक प्रतिसाद मिळाला, तर कधी नकारही - तरीसुद्धा आमचा धीर आणि प्रयत्न ढळला नाही.

Athenry येथील एका विज्ञान प्रदर्शनादरम्यान आम्ही Valeo या स्थानिक कंपनीला आमचा प्रोजेक्ट सादर केला.



आमच्या आत्मविश्वास आणि कल्पकतेमुळे ते प्रभावित झाले आणि त्यांनी आमच्यात गुंतवणूक केली. Valeo कंपनीने आम्हाला केवळ निधीच दिला नाही, तर उत्कृष्ट तांत्रिक आणि व्यावसायिक पाठिंबाही पुरवला आणि आमचा प्रवास अधिक सक्षम केला. उरलेला निधी उभारण्यासाठी आम्ही iDonate मोहीम सुरु केली - आणि इथे आयर्लंडमधील मराठी समुदायाने आम्हाला हृदयपूर्वक साथ दिली. त्यांनी केवळ आर्थिक मदतच केली नाही, तर नव्या पिढीतल्या मुलींवर विश्वास ठेवून आमच्या प्रयत्नांना मनापासून आधार दिला. या माध्यमातून iDonate द्वारे आर्थिक मदत करणाऱ्या सर्व मराठी मंडळ सदस्यांचे मी मनःपूर्वक आभार मानू इच्छिते. तुमच्या पाठिंब्याशिवाय हा प्रवास पूर्ण होणं अशक्य होतं.

राष्ट्रीय स्पर्धेनंतर आम्ही World Finals Singapore 2025 मध्ये आयर्लंडचं प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरलो. जगभरातील ६० टीम्समध्ये आम्ही स्पर्धा केली - आणि स्पर्धेच्या शेवटी आम्ही १४वा क्रमांक मिळवला; तसेच अभिमानाने सांगते की आम्ही Innovative Thinking या श्रेणीत पुरस्कार जिंकला. हा पुरस्कार Alpine BWT या जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या फॉर्म्युला 1 टीमने स्पॉन्सर केला होता.

ट्रॉफी स्वीकारण्यासाठी आम्ही मंचावर गेलो आणि तो क्षण अविस्मरणीय होता. Ireland चा झेंडा हातात घेऊन देशाचं प्रतिनिधित्व करणं - हा आमच्या आयुष्यातील अभिमानाचा सोहळा होता. संपूर्ण टीम मंचावर उभी असताना, मनात एकच भावना होती - आयर्लंडचं नाव उजळवलं याचा प्रचंड अभिमान.

या पुरस्कारामुळे आम्हाला एक अनोखी संधी मिळाली: F1 Paddock चा खास दौरा - जिथे आम्ही F1 कार, तंत्रज्ञान, टीम्स आणि अगदी F1 drivers यांना प्रत्यक्ष भेटू शकलो. हा अनुभव खरंच once-in-a-lifetime होता.






## अभिमान, ओळख आणि कृतज्ञता

सिंगापूरमध्ये उभं राहून हातात Ireland चा झेंडा घेताना माझ्या मनात अभिमानाचं आणि कृतज्ञतेचं पर्वत उभा राहिला.

मी तिथे फक्त माझ्या शाळेचं आणि देशाचं नाही, तर माझी संस्कृती, माझं स्वप्न आणि मराठी समुदायाचंही प्रतिनिधित्व करत होते. या प्रवासात ज्यांनी मला साथ दिली - विशेषत: Valeo कंपनी, तसेच मराठी आणि भारतीय समुदाय, ज्यांनी देणगी, ऊर्जा आणि प्रेम दिलं - तुमचे मनःपूर्वक आभार.




**शार्वी रणदिवे**

मी भारतातून सात वर्षांची असताना आयर्लंडमध्ये आले. तेव्हापासून मी Loughrea, Co. Galway इथे राहत आहे - आणि हेच ठिकाण आता माझं घर बनलं आहे. मी St. Brigid's College मध्ये १२वीत शिकते, जिथे मला नवीन गोष्टी शिकण्याची, जडणघडणीची आणि समाजात स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मिळाली.

HYDERABADI KITCHEN
Locations: Camden Street | Sandyford | Parnell Street
Website: www.hyderabadikitchen.ie

# ऋणानुबंध

- हर्षदा पाटील

माझ्या बाबा आणि आईनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे या नवीन देशात शिक्षण संपूर्पर्यंत मी आयरिश फॅमिली सोबत राहण्याचे ठरवले.

आयर्लंडला येण्याआधी मी युनिव्हर्सिटी मधून डब्लिन येथे राहण्याची सोय करण्यासाठी अधिक माहिती घेतली आणि इमेलमार्फत एक आयरिश वृद्ध महिलेशी संपर्क साधला. प्रेमळ स्वर आणि आवाज ऐकून मला माझ्या आजीची आठवण आली. हलक्याफुलक्या गप्पा झाल्या आणि पुढे अजून काही दिवस फोन करण्याचे ठरवले. ठरल्याप्रमाणे पुढे काही दिवस व्हिसा आणि येण्याची तारीख अशी अद्ययावत माहिती मी तिला देत होते.

तिने एक खोली माझ्यासाठी राखीव ठेवली जाईल असा ईमेल व फोनवरुन करार केला. तोवर डब्लिन येथे एका छोट्या हॉस्टेल मध्ये तात्पुरती सोय झाली होती. डब्लिन मध्ये पोहोचल्यावर दुसऱ्याच दिवशी ठरल्याप्रमाणे मी तिला भेटावयास दिलेल्या पत्त्यावर गेले. थोडी शोधाशोध करुन घर सापडले. मला भेटून तिला खूप आनंद झाला . फक्त फोन आणि इमेल वरुन, माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून एक महिना जागा राखीव ठेवणाऱ्या त्या महिलेचा मला खूप आदर वाटला. मी तिला कुतूहल म्हणून विचारले, "तुम्ही ही जागा एक महिना माझ्यासाठी राखून कशी ठेवली, तुम्हास लोकांकडून खूप प्रश्न येत असाव्यात". यावर ती म्हणाली, "हो, खूप रिक्वेस्ट आल्या, त्यातील काही लोक इथे डब्लिन मधेच राहतात". मी म्हणाले, "मग तर ते लोक इथे येऊन जागा बघून लगेच करारसुद्धा केला असता". त्यावर ती म्हणाली, "हो, बरोबर आहे तुझं. पण मी तुला शब्द दिला होता आणि तो मी पाळला".

हे ऐकून सुरुवातीला खूप आश्चर्य आणि नंतर तेवढाच आदर वाटला. ही माझी पहिली आयरिश व्यक्तीची भेट. आणि त्यानंतर मला ह्या देशात समावेश करण्यासाठी फारसे प्रयत्न करावे लागले नाहीत. माझा शिक्षण पूर्ण होईपर्यंत तिने मला खूप मदत केली. कधी अशीच फिरण्यासाठी केलेली स्पेशल राईड, चर्च मधील तिच्या ग्रुपशी केलेली ओळख, परीक्षेवेळी तिने दिलेली लिफ्ट अशी अनेक उदाहरणे समोर येतात.

तिने दिलेले काही पदार्थ पाहून मी थोडा कमी तिखट आलू पराठा देण्याचे धैर्य दाखवले. असेच बरेच पदार्थ आणि त्यांची देवाणघेवाण यातून मला Irish आणि तिला आपल्या महाराष्ट्रीयन खाद्यसंस्कृतीची जाण झाली. दिवाळी सणानिमित्त तिने केलेले डेकोरेशन, दुकानातून आणलेल्या सुंदर पणत्या व स्वीट डेझर्ट यातून आम्ही Irish दिवाळी साजरी केली.

कधी आयरिश पद्धतीने जेवण करुन, कधी आपली महाराष्ट्रीयन (छोटी) थाळी देऊन हे नात अजून घट्ट केलं. जमेल तसे बाकी लोकांबरोबर ग्रुप तयार केले, त्यांच्याबरोबर छोट्या सहली केल्या, आयर्लंडमधील बरीच ठिकाणे पाहिली, त्याचा इतिहास आणि स्थळ अशी इत्यंभूत माहिती घेतली.

ह्या सर्व गोष्टीतून आपल्याला एका वेगळ्या जगाची ओळख झाली.

त्यानंतर पुढे एक वर्ष अजून एका Irish महिलेसोबत राहण्याचा योग आला. एका दुर्गम गावात कोणीही ओळखीचे नसताना, जाणवणारा एकटेपणा तिने जाणला आणि तिच्या मैत्रिणीशी ओळख तिने करुन दिली, रोज तिच्या मैत्रिणी येऊन माझ्याशी गप्पा करत. बरेच सामाजिक कार्यक्रम त्या गावात होत असत. कोणताही समारंभ असेल, त्या कार्यक्रमासाठीची संपूर्ण तयारी तिच्या घरातूनच सुरु होत असे. तसंच मेजवानीसाठी सर्वांना पुरेल इतका एखादा पदार्थ तयार करण्याची मोठी जबाबदारी तिच्यावर असे. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यास मी तिला थोडी मदत केली, अजून काही स्थानिक लोकांना भेटून कार्यक्रमाचे थोडा डेकोरेशन केला. या कार्यक्रमांतून मला त्या गावातील मोठ्या लोकांची ओळख झाली. तिची इतकी सामाजिक बांधिलकी बघून मला माझ्या आई, बाबांची आठवण झाली.

एके दिवशी, माझा वाढदिवस आल्याचे कळताच संध्याकाळी तिने छान सरप्राइज दिला की तुझ्यासाठी एक कॉमेडी नाटकाचे तिकीट बुक केले आहे. हे इतका छान सरप्राइज बघून मला खूप आनंद झाला. मग तयार होऊन तिच्या गाडीतून तिच्या मैत्रिणीबरोबर आम्ही निघालो. कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचल्यावर १००- १५० लोकांची प्रचंड गर्दी पाहून त्या कार्यक्रमाची लोकप्रियता कळाली. नवीन कलाकार आणि त्यांनी केलेले अस्खलित सादरीकरण पाहून खूप छान वाटले. नाटकाचे मध्यंतर झाले, आणि त्यांनी काही लोकल कार्यक्रमाबद्दल व कम्युनिटी बद्दल माहिती द्यायला सुरवात केली. हे सगळं सुरु असताना माझ्या त्या दोन Irish मैत्रिणी "मी आलेच हा" असं (इंग्लिश मध्ये) म्हणून कुठेतरी गायब झाल्या होत्या. त्याच्या काही स्थानिक कार्यक्रमाबद्दल त्यांनी माहिती दिली, आणि थोड्याच वेळात मी माझा नावाचा उच्चार माइकवरुन ऐकला. संयोजक माइकवरुन सांगत होते "आपल्या प्रेक्षकांमध्ये फक्त स्थानिक लोक नव्हेत तर त्यामध्ये एक भारतीय व्यक्तीसुद्धा आहे, महाराष्ट्रातून इथे आली आहे, इथे शिक्षण पूर्ण करुन आता नोकरी करत आहे, आणि आज तिचा वाढदिवस आहे, सगळ्यांतर्फे खूप साऱ्या शुभेच्छा". हे ऐकल्याबरोबर सगळ्यांनी टाळ्या वाजवून माझ्याजवळ येऊन मला शुभेच्छा द्यायला सुरवात केली, आणि

तेव्हाच माझी ती प्रिय मैत्रीण हसत हसत आली आणि म्हणाली "कसा वाटल तुला हे आजच सरप्राइज". मला तर हसू का आनंदाने रडू हा प्रश्न पडला होता.

कार्यक्रम संपल्यावर तिने मला एका छानश्या भारतीय रेस्टॉरंटमध्ये मेजवानी दिली.

इतका छान सरप्राइज, इतक्या लोकांसमोर अशी छान ओळख, लोकांची भेट असा छान बर्थडे अरेंज केल्याबद्दल मी तिचे खूप खूप आभार मानले.

ह्या अनोळखी देशात, आपल्या लोकांपासून दूर राहताना ह्या प्रेमळ महिलेने माझा वाढदिवस साजरा करण्यासाठी केलेले हे प्रयत्न पाहून मला भरुन आले आणि जाणवलं की तिने खरच मला तिच्या मुलीसारखच मानलय.

काही वर्षांपूर्वी डब्लिन जवळ एका ठिकाणी वृद्ध Irish घरमालकाच्या ठिकाणी राहण्याचा योग आला, ते आधी Garda मधे वरच्या हुद्यावर काम करत, त्याच्या कुटुंबातील सर्वांशी अजूनही गप्पा होतात, इतका प्रेमळ आणि मदत करणारा माणूस मी क्वचितच पाहिला आहे. दोन तास प्रवास करुन आम्हास विमानतळावरुन घरी नेण्यासाठी येणारा घरमालक मी प्रथमच पाहिला.

कोविडची साथ आली असतानाची एक गोष्ट आठवते. कोविड लस घेण्यासाठी एका छोट्या गावात अपॉइंटमेंट असल्याचे कळले, आणि खूप प्रयत्न करुनही त्या गावात बसची किंवा टॅक्सीची सोय झाली नाही. अशा अडचणीत असताना आमच्या घरमालकाला याबद्दल कळले. त्यांनी आम्हाला लगेच त्यांच्या गाडीतून जाण्याची कल्पना सुचवली. पटकन तयार होऊन आम्हास वेळेत त्या ठिकाणी पोहोचवले. तीन तास गाडीत वाट पाहून आम्हास परतही घेऊन आले. त्यांचे आभार मानावे तितके कमीच आहेत.

या प्रेमळ लोकांबरोबर इतकी वर्ष इथे राहून काहीही फारसे कष्ट न करता आपण इतक्या सहजतेने त्यांच्या संस्कृतीमध्ये समाविष्ट आहोत.

ही अशी उदाहरणे आहेत की जी आपल्याला ह्या नवीन देशात आपलेपणाची, आत्मियता आणि प्रेमाची अनुभूती देतात. आणि यासाठी जे प्रेमाचे बीज आपण पेरले आहे, त्याची परतफेड अशीच नकळतपणे होत राहील.



हर्षदा पाटील

My name is Harshada Patil, working in biotechnology industry as a Scientist, currently living in Waterford. My hobbies are reading, writing, travel and playing sports.



TRAVELOGUE
प्रवास वर्णन

# आयर्लंड ते फ्रान्स:
## मोटारसायकलवरचा स्वप्नवत प्रवास

- तेजश्री गुंडे

३५६१ किमी, ३० पेक्षा अधिक शहरं व गावं — संस्कृती, इतिहास आणि निसर्गाच्या रंगांनी रंगलेला अनुभव

आयरलँडच्या हिरव्यागार टेकड्यांमधून फ्रान्सच्या कलात्मक आणि ऐतिहासिक भूमीपर्यंतचा आमचा मोटारसायकल प्रवास हा जणू स्वप्नवत प्रवास होता. सुमारे ३५६१ किमी अंतर, ३० हून अधिक शहरं आणि गावं, तापमानात १३°C ते ३८°C इतका बदल - आणि प्रत्येक वळणावर नव्या दृश्यांचा, नव्या लोकांचा आणि नव्या अनुभवांचा संगम! फ्रान्सचा इतिहास, त्याची कलात्मक शहरं, जुने किल्ले, द्राक्षबागा आणि समुद्रकिनाऱ्यांवरील मोहक वातावरण - या देशाने आम्हाला प्रत्येक क्षणी मंत्रमुग्ध केलं.




### प्रवासाची सुरुवात – Galway ते Rosslare

आम्ही आयरलँडमधील Galway या शांत, कलात्मक शहरात राहतो. संगीत आणि समुद्रकिनाऱ्याच्या ओलसर हवेमध्ये न्हालेलं हे शहर आमचं दैनंदिन आयुष्य सुंदर बनवतं. पण या वेळेस आम्हाला काहीतरी वेगळं करायचं होतं — आणि मग ठरलं, “मोटारसायकलवरुन फ्रान्सपर्यंतचा प्रवास!”

पहिल्या दिवशी आम्ही Rosslare बंदरावर पोहोचलो आणि तिथून रात्रीच्या जहाजाने प्रवास सुरु झाला. समुद्राच्या लाटांवर झुलत असताना मनात केवळ एकच भावना होती — “नव्या क्षितिजाकडे वाटचाल सुरु झाली आहे!”

### दिवस २ : Cherbourg ते Paris
### - प्रेम आणि प्रकाशाचं शहर

सकाळी जहाज Cherbourg या ऐतिहासिक बंदरावर पोहोचलं. दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणी जपणारं हे ठिकाण एक वेगळी शांतता देतं. तिथून आम्ही मोटारसायकलवरुन थेट Paris कडे मार्गक्रमण केलं. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना फुललेली शेतं, छोटे दगडी पूल आणि अधूनमधून दिसणारी किल्ल्यांची छटा — प्रवास सुंदर बनवत होते.



संध्याकाळी Eiffel Tower समोर उभं राहिल्यावर मात्र शब्द हरवले. प्रकाशात चमकणारा मनोरा आणि त्याखाली गजबजलेलं शहर — जणू एखाद्या चित्रपटातील दृश्यासारखं वाटलं. त्या रात्रीचा अनुभव आमच्या प्रवासाचा पहिला “अविस्मरणीय क्षण” ठरला.

### दिवस ३ : Paris ते Grenoble
### - डोंगरांच्या कुशीतलं शहर

दुसऱ्या दिवशी आम्ही Lyon मार्गे Grenoble या पर्वतांच्या कुशीत वसलेल्या शहराकडे निघालो. हे शहर “Capital of the Alps” म्हणून प्रसिद्ध आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे डोंगर, नद्या आणि निसर्गाचा शांत स्पर्श — सगळं काही जणू जिवंत होतं. Grenoble मधील त्या डोंगरावरच्या संध्याकाळीचे दृश्य मात्र आमच्या मनात कायमच कोरलेलं राहील — संध्याकाळचा सोनेरी प्रकाश, खाली पसरलेलं शहर आणि शांत वारा... एक अविस्मरणीय क्षण!



दिवस ४ : Grenoble ते Digne-les-Bains
- 'Napoleon Route' वरून

या दिवशी आम्ही प्रसिद्ध 'Napoleon Route' वरून प्रवास केला. हा मार्ग नद्या, दऱ्या आणि हिरव्यागार प्रदेशातून जातो. मोटारसायकलवरून जाताना प्रत्येक वळणावर नवा निसर्ग दिसत होता. अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे आम्ही Digne-les-Bains या छोट्या पण सुंदर शहरात थांबलो. डोंगरांच्या मध्ये वसलेलं हे शहर उबदार आणि शांत वाटत होतं. रात्री बाल्कनीतून पडणारा पाऊस आणि दूरवर चमकणाऱ्या दिव्यांनी वातावरण अजूनच स्वप्नवत केलं.



दिवस ५ : Digne-les-Bains ते Marseille
- सुगंध, समुद्र आणि चित्रपट

सकाळी आम्ही Grasse मार्गे निघालो. 'Perfume Capital of the World' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहराचा सुगंध प्रवासात मिसळला. तिथून Cannes या चित्रपट नगरीला भेट दिली, जिथे दरवर्षी जगप्रसिद्ध Cannes Film Festival भरतो. दिवस संपता संपता आम्ही Marseille ला पोहोचलो. समुद्रकिनाऱ्यावरील हे गजबजलेलं शहर, जुन्या वास्तू आणि उत्साही लोक - सगळंच आकर्षक होतं.



दिवस ६ : Marseille ते Toulouse
- इतिहास आणि संस्कृतीचा संगम

या दिवशी आम्ही Nimes या प्राचीन रोमन शहराला भेट दिली. इथले २,००० वर्षांपूर्वीचे Amphitheatre आजही भव्य उभे आहेत. त्या वास्तूंनी इतिहासाच्या गंधाने आम्हाला भारावून टाकलं. नंतर आम्ही Toulouse कडे निघालो. हे शहर 'Pink City of France' म्हणून ओळखलं जातं, कारण इथल्या इमारती लालसर विटांच्या रंगात नटलेल्या आहेत.
तरुणाईचा उत्साह आणि संगीताचा गंध या शहराच्या हवेत मिसळलेला वाटतो.

दिवस ७ : Toulouse ते Bordeaux मार्गे St. Emilion
- वाईनच्या प्रदेशात

या दिवशी आमचा प्रवास St. Emilion या प्रसिद्ध वाईन गावाकडे होता. द्राक्षबागांनी सजलेली टेकड्या, शांत रस्ते आणि ऐतिहासिक दगडी चर्च — सगळं काही अप्रतिम होतं. Bordeaux मध्ये पोहोचल्यावर आम्ही फ्रान्सच्या प्रसिद्ध वाईनचा आस्वाद घेतला आणि तिथल्या लोकांच्या प्रेमळ स्वागताने मन जिंकलं.

दिवस ८ : Bordeaux ते Nantes
- Cognac चा सुवास

Cognac शहराच्या मार्गावर आम्ही प्रसिद्ध Hennessy Cognac House ला भेट दिली. पेयनिर्मितीचा इतिहास आणि त्यामागची कलाकुसर पाहून थक्क झालो. नंतर Rennes येथे एका जुन्या मित्राला भेटून आम्ही Nantes गाठलं. हे शहर फ्रेंच सांस्कृतिक वारसासाठी प्रसिद्ध आहे. नदीकिनारी उभे असलेले किल्ले आणि जुन्या गल्लीतील कॅफेंनी आम्हाला मोहून टाकलं.




## दिवस ९ : Nantes ते Saint Mont Michel मार्गे Saint Malo – परिकथेसारखा दिवस

हा दिवस आमच्या प्रवासातील सर्वात जादुई ठरला. Saint Mont Michel, समुद्राच्या मधोमध वसलेलं प्राचीन ठिकाण, भरती-ओहोटीमुळे कधी बेट तर कधी भूमी बनतं. त्या दृश्याने आम्ही स्तब्ध झालो. नंतरचं Saint Malo – तटबंदीने वेढलेलं सुंदर शहर. जुन्या इमारती, अरुंद गल्ल्या आणि समुद्राचा सुगंध – जणू Harry Potterच्या जादुई जगात फिरत आहोत असं वाटलं.



## दिवस १० : Cherbourg ते Ireland - परतीचा प्रवास

शेवटच्या दिवशी आम्ही Cherbourg बंदरावरुन परत आयरलँडकडे निघालो. जहाजावर बसून मागे सोडलेली फ्रान्सची किनारपट्टी हळूहळू अदृश्य होत होती, पण मन मात्र अजूनही त्या दृश्यांमध्ये गुंतलेलं होतं. हा प्रवास माझ्या पतीच्या ४०व्या वाढदिवसानिमित्त केलेली खास भेट होती – आणि ती आमच्या आयुष्यभराच्या आठवणींचा अमूल्य भाग बनली.



## प्रवासाची शेवटची नोंद

दहा दिवस, हजारो दृश्यं, आणि असंख्य आठवणी - या मोटारसायकल प्रवासाने आम्हाला फक्त फ्रान्स दाखवला नाही, तर “प्रवास म्हणजे जीवन” ही जाणीव करून दिली. वारा, डोंगर, समुद्र आणि निसर्गाचा नाद – हे सगळं अजूनही आमच्या मनात गुंजतंय. आता जेव्हा मोटारसायकलचा इंजिन सुरु होतं, तेव्हा मन पुन्हा म्हणतं - “पुढचं ठिकाण कुठं असावं?”



### तेजश्री गुंडे

माझे पती सुवर्ण आणि आमचे दोन मुलगे (वय ११ आणि ८), आणि आमची कुत्री Ruby यांच्यासह आम्ही २०१२ पासून Galway (Ireland) येथे राहतो. आम्हा सगळ्यांना प्रवास, संगीत आणि खाद्यसंस्कृतीची प्रचंड आवड आहे. आम्ही दोघेही इंजिनिअर्स आहोत. मला नृत्य, गायन, फिटनेस, आणि पुस्तकं गोष्टींचा छंद आहे – अलीकडे मी Krav Maga शिकले आहे.
सुवर्णला ड्रायव्हिंग, मोटारसायकल रायडिंग आणि Guitar, Violin, Keyboard, Harmonica वाजवणं आवडतं. तो एक उत्तम टेक्नॉलॉजी प्रेमी आणि खूपच स्मार्ट व्यक्ती आहे.

SARAVANAA BHAVAN
WORLD'S NO.1 INDIAN VEGETARIAN RESTAURANT CHAIN
Address: Unit 11-18 Belgard Square W, Tallaght, Dublin 24, D24 TWR2
Website: www.saravanabhavan.com
Email: hsbdublin@saravanabhavan.com
Contact No: +35315671405


# Eiffel Tower to Alps Adventurous Family Journey

- Pradhnya Panse

Like every Indian girl, my dream destination had always been the same—yes, you guessed it right: Switzerland. After a lot of thought, endless discussions, and convincing ourselves that it was okay to splurge a little on a dream, we finally decided to make it happen. And so, our much-awaited journey was planned for summer 2025.

This trip promised excitement, beauty, and a few unexpected adventures—so fasten your seatbelts and come along as I take you through our unforgettable family holiday.

To make the journey special for everyone, we decided to start in Paris before heading to Switzerland. This way, our children could experience their most-awaited destination—Disneyland Paris. With everyone's well wishes, we set out to create the perfect family vacation.




## Paris: Three Days of Wonder and Magic

Our first stop in Paris was the iconic Eiffel Tower. No matter how many pictures you've seen, nothing prepares you for the moment you stand beneath it.

Going up inside the tower is a completely different experience - Paris slowly unfolds beneath you, with rooftops stretching endlessly in every direction. By evening, the Eiffel Tower transforms into pure magic, glowing golden with sparkling lights that shimmer every five minutes. It honestly felt surreal.

Day two was all about Disneyland Paris - a place where imagination comes alive. The moment you enter, you're transported into a dream world full of color, joy, and excitement. Every ride has its own story, and watching the happiness on my daughter's face was priceless. Disney truly knows how to make every moment extraordinary. From fairytale castles for little princesses to thrilling rides like Pirates' Land, the magic was endless.

On our third day in Paris, we started with a one-hour Seine River cruise departing from the Eiffel Tower. Sailing on a sightseeing trimaran, we enjoyed stunning views of landmarks like the Louvre, Palais Bourbon, and Notre-Dame, while the audio and live commentary shared fascinating stories about the city's history.

Later, we visited a Paris aquarium, an experience enjoyed by both kids and adults. The highlight was the mermaid show - watching her gracefully dance underwater felt truly magical, like a fairytale come to life. The kids were completely mesmerised.

## Switzerland: Where Every View Feels Like a Picture Postcard

From Paris, we headed to our most anticipated destination - Switzerland. And honestly, the moment you arrive, it feels like nature has designed everything to perfection. Serene lakes, majestic mountains, and charming villages - every frame looks unreal.

We rented a car to explore at our own pace, and my husband absolutely enjoyed driving, especially since the steering wheel is on the left-hand side. Every drive felt like moving through a painting, with landscapes changing beautifully at every turn.
One of our most memorable experiences was Mount Pilatus. We started with a scenic Lake Lucerne cruise from Lucerne to Alpnachstad. The moment the cruise began, we were surrounded by breathtaking mountain views on all sides. The ride was calm and relaxing, with a small restaurant on board where you could enjoy coffee while soaking in the scenery. It was the perfect time to slow down, click pictures, and just enjoy the moment.




From there, we boarded the world's steepest cogwheel train to reach Mount Pilatus. The engineering itself is incredible, and as the train climbs higher, the views just keep getting better. On the way back down, we took the cable car, and the panoramic views of the Alps made it feel like we were floating above the mountains.

## Jungfraujoch - Home to the highest railway station in Europe

The next day, we visited Jungfraujoch. This place guarantees snow all year round, and it was magical. Surrounded by endless snow and glaciers, we felt completely mesmerised. We played in the snow and explored the Ice Palace, filled with stunning ice sculptures. The beauty and scale of the place are truly beyond words.

After Jungfraujoch, we explored Interlaken, an outdoor lover's paradise. My husband and daughter tried paragliding, and my daughter described it perfectly— "I felt like a bird, flying freely over the mountains." Interlaken itself is charming, with beautiful resorts, shops, and views everywhere you look.




Our journey continued to Grindelwald, a place that feels like it has stepped straight out of a fairytale. Nestled in the heart of the Swiss Alps, every corner here looks unreal. The highlight was the First Cliff Walk - a breathtaking metal walkway suspended from the mountainside at Grindelwald First. Walking along it, with nothing but air and vast valleys beneath us, was both thrilling and humbling. The views of the surrounding mountains were spectacular. Grindelwald is also a hub for adventure, offering activities that perfectly balance adrenaline with natural beauty.

From adventure, we moved into pure serenity.
We then visited Mürren, a charming, car-free mountain village often called one of the most beautiful in Switzerland. And honestly, it felt like heaven on earth. Picture-perfect wooden houses decorated with flowers, peaceful pathways, and 360-degree panoramic views of the Alps in every direction. The air felt calmer, the moments quieter, and the beauty—completely unforgettable.

Mürren has a charm that's impossible to describe and even harder to forget.

We also visited places close to every Indian heart - iconic Saanen Bridge and Railway Station, where the legendary DDLJ "PALAT PALAT "scene was shot. That place truly has a vibe. It feels magical standing there.




## When the Unexpected Happened

Now comes the most difficult part of our journey, but also an important one to share.

Our younger daughter really wanted to try the Alpine Coaster ride at Mount Pilatus. It wasn't part of our plan, but we didn't want to disappoint her. The instructions seemed simple—even young children were allowed to ride.

I went with my elder daughter, while my husband went with our younger one. She sat in the driver's seat, excited and confident. Unfortunately, she couldn't control the speed, and the coaster started losing control near the edges. In an attempt to stop it, my husband used his hand, which rubbed against rocks and metal, badly injuring him. Our daughter, thankfully, remained unaware of the seriousness of the situation.

I was distraught to see my husband hurt badly in the accident. He was brought back, his shirt soaked in blood, yet by God's grace, he felt no pain. After first aid, we rushed to the hospital, where he required 14 stitches. We spent almost the entire day there. Despite everything, he remained calm and strong.

The next day - our final day

My husband was feeling fine. Just to be cautious, we went back to the clinic for bandaging and decided not to let fear define the end of our trip. We visited the Lindt Chocolate Factory, and instantly, smiles returned. Chocolates, laughter, and a little indulgence healed our hearts.

Finally, we headed to Zurich Airport and made our way back to Ireland.

This journey gave us everything—beauty, adventure, fear, faith, gratitude, and resilience. It reminded us that travel isn't just about places; it's about experiences, lessons, and the strength we discover when life takes an unexpected turn.



**Pradhnya Panse**

I'm Pradhnya Jadhav Panse, a Quality Auditor -Specialist at TELUS International, living in Ireland for the past eight years. I believe in enjoying life to the fullest and finding joy in everyday moments as well as new experiences.
Traveling brings me immense happiness - it allows me to explore new cultures, places, and perspectives. Through this travel blog, I share my journeys, experiences, and stories in the hope of inspiring others to explore, connect, and live joyfully.

Career Ireland

Address: 109, Windmill Park, Crumlin, Dublin, Ireland D12Y0YX
Website: www.careerireland.com
Email: connect@careerireland.com
Contact No: +353 899471396

# एक ऐतिहासिक सहल

- हर्षदा पाटील

वातावरणाचा अभ्यास करुन भ्रमंतीसाठी योग्य वेळ निवडली, बऱ्याच गहन विचार आणि कौटुंबिक चर्चेनंतर दिल्ली, आग्रा आणि जयपूर अशी ट्रिप करायचे ठरवले, वेळ आणि संधी न दवडता लगेच विमानाची तिकिटे बुक केले. खूप दिवसांनी अशी आई बाबांबरोबरची ट्रिप ठरल्याने उत्साह वाढला होता.

विमानाने दिल्ली येथे पोहोचलो. पहिला मुक्काम दिल्लीमध्ये होता, राहण्याची सोय केली होती. मी दिल्ली प्रथमच पाहत असल्याने माझी उत्सुकता वाढली होती.

पहिल्याच दिवशी लाल किल्ला पहायचे ठरले. लाल किल्ल्यामध्ये रात्री जयहिंद नावाचा एक लाईट आणि संगीत शो असल्याचे कळले. अमिताभ बच्चन यांनी हिंदी आणि कबीर बेदी यांनी इंग्लिशमध्ये ह्या संपूर्ण शो मध्ये आवाज दिलेला आहे. इतकी छान संधी न दवडता लगेच त्या शो ची तिकीट बुक केली. हा लाईट आणि साउंड शो आपल्याला इतिहासातील शाहजहानने किल्ला बांधला आणि ब्रिटीशांनी भारतावर राज्य केले त्या काळात घेऊन जातो. हा शो आपल्याला किल्ल्याच्या काही महत्त्वाच्या भागांची एक छोटीशी सफर घडवतो. प्रेक्षक नौबत खाना (जिथे ढोल वाजवले जात असत), दिवाण-ए-आम (इथे सर्व लोकांसाठी दरबार भरला जात असे) आणि दिवाण-ए-खास (येथे खास व्यक्तींसाठी म्हणजे राजघराण्यातील मोठ्या व्यक्ती किंवा पाहुणे दरबार भरला जात असे) असा छोटा पण ऐतिहासिक प्रवास करतात. त्याची सुरवात नौबत खाना येथे मैं हिंदुस्तान हूं, मैं वक्त हूं अशा अमिताभ बच्चन यांच्या भारदस्त आवाजात होते. तसंच पुढे शाहजहानचा लाल किल्ल्यामध्ये झालेला प्रवेश, असा इतिहास कथन पाहून आम्ही थोडा चालत दिवाण-ए-आम येथे निघालो. सुंदर कोरीव काम केलेले खांब, प्रशस्त हॉल मध्ये कलाकारांनी कथक नृत्य सादर केले. शोचा शेवटचा भाग सुमारे ४० मिनिटे दिवाण-ए-खास येथे केले. शाहजहान नंतर War of succession, कोहिनूर, ईस्ट इंडिया कंपनीचा प्रवेश आणि त्यानंतरचा प्रसार, त्याचे परिणाम, आझाद हिंद फौज ते स्वातंत्र्य असा प्रवास लाईट, साउंड, नाटक, अभिनय आणि नृत्य यांचा वापर करून आपल्या देशाच्या इतिहासाची एक प्रेरणादायी कथा सांगितली गेली.

पुढे एक दिवस दिल्ली मध्ये इंडिया गेट, कुतुब मिनार, लोटस टेम्पल, राज घाट, जंतर मंतर, जैन मंदिर , चांदणी चौक अशी अनेक प्रसिद्ध ठिकाणे पाहिली. या प्रत्येक ठिकाणी आपणास आपल्या देशाच्या इतिहासाची ग्वाही मिळते.

पुढचा दिवस हरिद्वार आणि ऋषिकेश येथे जाण्याचे ठरवले. डिसेंबर महिना असण्याने वातावरण थंड होते, गाडीतील हिटर पूर्ण वेळ चालू ठेवून आणि गरम पेये घेऊन सर्दी घालवण्याचा प्रयत्न चालूच ठेवला.



Jai hind show, Red fort, Delhi

हरिद्वार येथे माँ मनसा देवी मंदिर आणि चंडी देवी मंदिर, सप्तर्षी आश्रम, हर की पौडी ही पाहण्यासारखी स्थळे आहेत. तिथे पोहोचल्यावर प्रथम माँ चंडी देवीचे दर्शन घेण्याचे ठरवले. नील पर्वतावरील श्री माँ चंडी देवी मंदिरात प्रवेश करण्यासाठी केबल कारची सुविधा आहे, आणि वर पर्वतावरून दिसणारं हरिद्वारचं दृश्य अविस्मरणीय आहे. त्यानंतर तेथील हर की पौडी हा पवित्र घाट पहिला. लोकांचा असा विश्वास आहे की भगवान विष्णू, येथील एका दगडावर त्यांचे पाऊल ठेवतात, त्या शिळेवर त्यांचे छाप आहे. गंगा नदी तिथे भगवान विष्णूंना भेटण्यासाठी येते.

तिथून पुढे २०-२५ किमी प्रवास करून ऋषिकेशला पोहोचलो. तिथे पोहोचल्यावर त्रिवेणी घाट, लक्ष्मण झुला, निळकंठ महादेव मंदिर अशी पवित्र आणि महत्त्वाची ठिकाणे पाहिली.

ऋषिकेशला हिमालयाचे द्वार अशीही उपाधी आहे, येथील जंगलातून आणलेले रुद्राक्ष येथे विकत मिळतात. विकत घेण्यापूर्वी लॅब सर्टिफिकेट पाहून ओरिजनल असल्याची खात्री करावी. येथे योगा शिकण्यासाठी आश्रम आहे, खूप शांत आणि पवित्र असे वातावरण आहे. तिथे रिव्हर राफ्टिंगसारखे ॲडव्हेंचर स्पोर्ट्स पण केले जातात.



Rishikesh


परत दिल्लीमध्ये आल्यावर पुढच्या प्रवासाची तयारी केली. आमचा पुढचा प्रवासमार्ग मथुरा, वृंदावन आणि आग्रा असा होता

मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमी मंदीर पाहिले, जेथे श्रीकृष्ण भगवान यांचा जन्म झाला, ते पवित्र स्थळ पाहावयास मिळाले. मग पुढे वृंदावन येथील बांके बिहारी मंदिर व प्रेम मंदिर पहिले. मंदिरांची इतकी सुंदर रचना आणि कोरीवकाम पाहून थक्क व्हायला होते.

नंतर, आम्ही प्रसिद्ध ताजमहाल पाहण्यासाठी आग्र्याला गेलो. ही अद्भुत इमारत बांधण्यासाठी २१ वर्षे लागली, २८ वेगवेगळ्या प्रकारचे दगड आणि २०,००० हून अधिक कामगारांनी खूप मेहनत घेतली. पुढे आम्ही आग्रा किल्ला आणि फतेहपूर सिक्रीला देखील भेट दिली, इथे मुघल राजांनी खूप पूर्वी बनवलेले सुंदर जुने राजवाडे आहेत.

पुढे अजून प्रवास करून जयपूर येथे पोहोचलो आणि रात्री मुक्काम केला. तिथून पुढच्या दिवशी सवाई माधोपुर येथील रणथंबोर अभयारण्य व बंगाल वाघ पाहण्यासाठी निघालो. ३९२ Sq किमी रणथंबोर टायगर रिझर्व वेगवेगळ्या झोन्स मध्ये विभागला आहे, आणि ह्यातील झोन १ आणि २ मध्ये वाघ दिसण्याची शक्यता जास्त असते आणि त्यामुळे या सफरीचे बुकिंग लवकर करावे लागते. आम्ही नेहमीच्या प्रथेप्रमाणे उशीरा पोहोचल्याने आम्हास झोन ७ चे तिकीट मिळाले. सध्या झोन २-३ मध्ये मछली नामक वाघीण व तिची पिल्ले राहतात अशी माहिती मिळाली. जशी सफारी सुरु होऊन ३० मिनिटे झाली तशी ती वाघीण व तिची पिल्ले पाहण्याची शक्यता कमी होत गेली. तरीही अभयारण्यात खूप सारे विविध प्रकारचे पक्षी, वनस्पती, हरिण, मगर पहावयास मिळाले.

या साहसानंतर पुढे आम्ही चित्तोरगढ पाहावयास निघालो. हा भारतातील सर्वात विशाल गड म्हणून ओळखला जातो तसंच या गडाचे ऐतिहासिक महत्त्व खूप आहे. इसवीसन १३०३ मध्ये अलाउद्दीन खिलजीने केलेल्या आक्रमणानंतर राणी पद्मिनी ने १६,००० सेविकांबरोबर केलेला आणि अजून २ जोहर या गडावर झाले.


Chittorgarh

तिथून जवळच विजयस्थंभ आणि कीर्तीस्थंभ आहेत. सन १४४० मध्ये महाराणा कुंभाने मालवाचे सुलतान महमूद शाह खिलजीवर मिळवलेल्या विजयाप्रीत्यर्थ विजयस्थंभ बनवला. त्यावर विष्णूची विविध रुपे, ब्रह्म, शिव व अन्य देवदेवतांच्या मूर्ती आहेत. जवळच १२व्या दशकात बांधलेला कीर्तीस्थंभ ही सात मजली स्तंभ जैन मंदिरात स्थापित केला आहे.

त्यानंतर आम्ही कुंभलगडाकडे प्रस्थान केले, हा अरवली पर्वतरांगेतील ३२ किमी तटबंदी असलेला अजून एक मोठा किल्ला आहे. महाराज कुंभाने हा गड १४५८ मधे मेवाडची सुरक्षा करण्यासाठी बनवला होता. राजा महाराणा प्रताप यांचा जन्म ही याच गडावर झाला.


Kumbhalgarh

त्यापुढे रानकपूर येथील आदिनाथ तीर्थकारांचे मंदिर आणि मुछला महावीर जैन मंदिर येथील अदभुत अशी कलाकारी पाहिली आणि प्रवासाचा क्षीण नाहीसा झाला.

मग नंतर उदयपूर येथील सिटी पॅलेस, सहेलियोंकी बारी, लेक पिछोला ही ठिकाणे पाहिली. अरवली पर्वतरांगेतील हल्दीघाटीतील युद्धाचा संदर्भ सिटी पॅलेस मधील म्युझियममध्ये दिला जातो. हल्दीघाटी मधील पिवळ्या रंगाच्या दगडामुळे त्यास हे नाव दिले आहे. १५७६ मध्ये सत्तेसाठी मुघल अकबर आणि मेवाड यामध्ये युद्ध झाले.

आम्ही पुढे जयपूरजवळ नाहारगढ, जयगड, हवामहाल अशी ट्रिप केली. आणि पुढे परतीचा प्रवास सुरु केला. अशी ही कमी वेळेत पूर्ण झालेली पण प्रत्येक क्षणी इतिहासाची साक्ष देणारी अशी ही टूर पुन्हा एकदा करायची असा संकल्प केला.



हर्षदा पाटील

# Thanjavur:
## The Tamil–Marathi Connection

- Sumedh Naik

As the second wave of COVID-19 gradually subsided in 2021, our family longed for a journey, not just a holiday, but a rediscovery of life beyond the lockdown. India's southern region has always fascinated us. The southern states, each with its own rich history, cultural pride, and distinct natural beauty, represent a version of India that many in the north or west rarely experience deeply, especially beyond the usual tourist circuits. We had previously visited parts of South India, but Tamil Nadu was still a treasure chest unexplored in its entirety. Its spiritual heritage from the ancient lanes of Madurai to the sacred confluence at Rameshwaram called out to us. That sealed our plan: Tamil Nadu it would be.

After completing a beautiful route through Chennai, Mahabalipuram, and the charming Franco-Indian town of Pondicherry, we headed towards the ancient capital of the Cholas: Thanjavur. Known as the land of emperors, temples, and art, Thanjavur also holds within it a lesser-known but heartfelt connection to our own state roots, the legacy of the Thanjavur Marathas.



### Arrival in the City of the Great Cholas

The moment we entered Thanjavur, a colossal structure dominated the skyline, the Brihadeshwara Temple, or as locals lovingly call it, Peruvudaiyar Kovil, "The Big Temple." Built by the mighty Raja Raja Chola I in the 11th century, it is one of UNESCO's celebrated Great Living Chola Temples, alongside Gangaikonda Cholapuram and Airavatesvara Temple.

Crossing the massive sandstone gopuram, we entered a world where art and devotion stand frozen in time. The 216-feet-high vimana, towering yet perfectly proportioned, left me in sheer awe. The temple's engineering marvels, from its delicate carvings to the mysterious monolithic kumbam atop the vimana, prove that ancient India was far ahead of its time.

The spiritual experience peaks at the sight of the 28.5-foot Shiva Lingam inside the sanctum, radiating a divine energy shaped by centuries of devotion. Sculptures depicting various forms and legends of Lord Shiva adorn the temple walls: a testament to the Cholas being ardent Shaivites.

For a while, we just stood there, absorbing the sanctity and majesty of a structure that has seen over a thousand years of history yet remains as alive and revered today as ever.

### A Taste of Tradition: A 27-Course Clay-Pot Feast

Reluctant to leave the temple but hungry after hours of exploration, we headed back to our car only to find a flyer tucked beneath the wiper. It advertised a restaurant with a 27-item vegetarian clay-pot cooked thali, intriguingly named "Chellammal's Manpaanai Samayal."

Curiosity took over, and soon we arrived at what looked like a restored Chettinad heritage home: warm, rustic, and inviting. Women ran the restaurant entirely, and as they placed the banana leaf before us, dish after dish arrived until the leaf was a vibrant

mosaic of Tamil flavours; all clay-pot cooked, preserving an earthy aroma and unparalleled taste. The hygiene was impeccable, the pricing honest, and the flavors unforgettable. It wasn't just a meal; it felt like being embraced by local hospitality.




## Walking into Marathi Legacy: The Thanjavur Maratha Palace

Our next destination was the Thanjavur Maratha Palace, originally built by the Nayaks but taken over by the Marathas when the Nayaks fell. It was here that a proud chapter of Maratha history unfolded, one rarely highlighted in mainstream historical narratives.

In the late 17th century, Venkoji (Ekoji) Bhosle, the half-brother of Chhatrapati Shivaji Maharaj, established the Thanjavur Maratha Kingdom. Over time, Marathi traditions seamlessly interwove with Tamil culture, creating a unique cultural synthesis that survives even today. Under the rule of the scholarly king Serfoji II, the kingdom flourished, especially in fields of administration, literature, and education.

Inside the palace complex lies the prestigious Saraswathi Mahal Library, home to palm-leaf manuscripts and ancient records, including many written in Modi script, once used for Marathi royal documentation. Seeing these documents preserved so lovingly far away from Maharashtra stirred a deep sense of pride within me.




## The Artistic Soul of Thanjavur


No visit to Thanjavur is complete without witnessing its famed art: the Thanjavur Paintings. Known for their gold foil embossing and vibrant devotional themes, these paintings illuminate the prayer rooms (devghars) of countless Tamil homes.

We visited a local artist's house to understand the intricate process behind this living heritage. His walls were lined with divine artwork, each stroke reflecting patience and devotion. Among all the masterpieces, one caught my eye: a painting of Chhatrapati Shivaji Maharaj and his wife Rani Saibai Bhosle seated on a regal throne, depicted in pure Thanjavur style. Seeing the Maratha legacy find expression in Tamil artistic tradition was an emotionally enriching sight.

## Finding My People: The Thanjavur Marathi Community

As a Maharashtrian myself, discovering this cross-cultural bond only heightened my desire to learn more about the Thanjavur Marathi community. Many people in Maharashtra are unaware of this diaspora and their unique history. Even widely-loved dishes, such as sambar, have stories claimed to link them to the Marathas, believed by some to be named after Chhatrapati Sambhaji Maharaj.

Perhaps the most surprising yet well-known example of Tamil-Marathi interwoven identity is none other than cinema legend Rajinikanth, born Shivaji Rao Gaikwad into a Marathi family, a reminder of how identities can harmoniously transcend borders.




To truly connect, I located the Maharashtra Sadan of Thanjavur. There, I met a woman speaking the regional Thanjavur Marathi dialect; softer, blended with Tamil influences, but still familiar enough for me to follow. The Sadan included a small temple and a mutt dedicated to Samarth Ramdas Swami, where the community gathers to sing bhajans, preserving the faith and heritage carried here centuries ago by their Maratha ancestors.

It felt like discovering a long-lost branch of my family's story, one that had silently thrived hundreds of kilometres away.

## A Heart Full of Memories

As the sun set on our unforgettable day in Thanjavur, I picked up a few Marathi books authored in Thanjavur, precious tokens of a heritage that bridges Maharashtra and Tamil Nadu. They are now a cherished part of my bookshelf and of my identity.

Thanjavur gave me more than monuments and meals. It gifted me a profound realisation of how cultures mingle, evolve, and endure. In its temples, palace libraries, paintings, and people, I found threads of my own history lovingly woven into Tamil soil.

Travel often reveals new worlds, but sometimes, it helps you rediscover your own.



Sumedh Naik

I hold a Master's degree in Global Health from Trinity College Dublin. I am a passionate numismatist and antique collector with a strong appreciation for history and heritage. I am also an avid traveller, always eager to explore new cultures and perspectives. Alongside my academic and professional interests, I am an enthusiastic admirer of classical Indian music and dance, which deeply influence my cultural outlook.

# अनोळखी माणसं, अविस्मरणीय अनुभव

- दीपिका अभिजीत कुलकर्णी

प्रसंग १ : लंकावी

प्रवास माणसाला समृद्ध करतो, असे आपण नेहमीच ऐकतो आणि ते शंभर टक्के खरे आहे. पण आता असे वाटते की प्रवास फक्त समृद्धच करत नाही, तर आपली अनेक मतं, समजुती आणि विश्वास देखील हलकेच बदलून टाकतो. नवीन ठिकाणे, नवीन माणसे आणि नव्या संस्कृती - हे सर्व पाहताना आपल्या विचारविश्वाला एक वेगळीच दिशा मिळते.

लहानपणी एक अगदी छोट्याशा खेड्यात वाढलेली मी. आसपास फारशी साधन - सामुग्री नव्हती, पर्याय तर हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच. अशा या साध्या वातावरणात माझी स्वतःची एक छोटीशी आशेची खिडकी आयुष्यात होती - रविवारी घरी येणारे वृत्तपत्र आणि त्याची खास पुरवणी. त्या पुरवणीत अनेक मोठ्या दिग्गजांनी लिहिलेली प्रवासवर्णने, जगभरातील ठिकाणांचे मनोहर वर्णन - हे सगळं माझ्या टाळ्या लहानशा मनाला एका अद्भुत जगात घेऊन जात असे. ते वाचून कायम वाटायचे, "आपणही कधी असा जगभरचा प्रवास करू शकू का?" आजच्या भाषेत म्हणतात तसं, ते एक प्रकारचे 'मॅनिफेस्टेशन'च होते कदाचित. आणि आयुष्यही जणू त्या मनोमन केलेल्या इच्छेकडेच हळूच वळू लागलं. जगभर फिरण्याची स्वप्ने, वेगवेगळे अनुभव घेण्याची ओढ - हे सर्व नकळतच माझ्या आयुष्यात साकार होऊ लागले.

२०१४ साली नवऱ्याच्या कामानिमित्त आम्ही सिंगापूरला शिफ्ट झालो. हा देश तर सुंदर आहेच, पण त्याहून मोठी गंमत अशी की सिंगापूरमध्ये राहिलात की दक्षिण - पूर्व आशियातील नयनरम्य ठिकाणं अक्षरशः हाकेच्या अंतरावर येतात. त्यामुळे डोनेशिया, मलेशिया, थायलंड, कंबोडिया - अशी अनेक देश पाहण्याची संधी मिळत गेली. प्रत्येक देश अनोखा, प्रत्येक ठिकाण वेगळंच मोहक. निसर्गतर सगळीकडे सुंदर असतो, पण चार भावंडांत एकाला आई जस खास जपून ठेवते, तसंच जणू देवानेही काही लहान - सहान देशांना अधिकच लाडाने सजवल्यासारखे वाटते. निळेशार समुद्र, शुभ्र किनारे, हिरव्यागार टेकड्या - जणू निसर्गाने प्रेमाने पसरवलेला हातच.

असाच एका लागून आलेल्या सुट्टीला आम्ही सिंगापूरहून अगदीच जवळ असलेल्या लंकावी ला जाण्याचा बेत आखला. दक्षिण - पूर्व आशियातील अनेक ठिकाणी फिरुन झालं होतं, पण लंकावीबद्दल ऐकलं की तिथली शांतता, निसर्ग आणि समुद्र यांचं अनोखं मिश्रण मनाला जखडून ठेवतं. त्यामुळे हा प्रवास विशेष असणार, याची आधीच जाणीव झाली होती.

लंकावीला पोहोचताच प्रथम अनुभवली तेथील निरव शांतता आणि. प्रसन्न वारा. बेटावरची प्रत्येक जागा जणू पर्यटनासाठीच निर्माण झाल्यासारखी वाटत होती. स्काय ब्रिजवरील निसर्गदर्शन, आयलंड हॉपिंग मधील समुद्राची जादू, मॅन्ग्रोव्ह फॉरेस्ट मधील शांत सफर, समुद्र किनारी बसून पाहिलेला सूर्यास्त - हे सर्व अनुभव आम्ही मनसोक्त घेतले. प्रवासात एक क्षणही निरस नव्हता. प्रत्येक वळणावर, प्रत्येक ठिकाणी काही ना काही नव्याने भुरळ घालणारे सौंदर्य दिसत होते.

सगळ्यात छान वाटलं ते म्हणजे या छोट्या बेटावर जगभरातून पर्यटक आलेले दिसत होते. वेगवेगळ्या संस्कृतींचे, वेगवेगळ्या भाषांचे, विविध देशांतील लोक एकाच ठिकाणी निवांतपणे निसर्गाचा आनंद घेताना पाहणे हा स्वतःमध्येच एक सुंदर अनुभव होता.

लंगकावी जणू निसर्ग, शांतता आणि बहुसांस्कृतिकतेचं एक छोटंसं विश्वच वाटत होतं. दररोज दिवसभर बेटावर भटकणे, नवनवीन ठिकाणे शोधणे आणि संध्याकाळी बीचलगतच्या गजबजलेल्या स्ट्रीटवरील वेगवेगळ्या रेस्टॉरंट्समधून एक छानसं ठिकाण निवडून तिथे मस्तपैकी जेवणाचा आस्वाद घेणे - हा आमचा रोजचा पक्का प्लॅन झाला होता.

पहिल्या दिवशी सुंदर बीचेस पाहून मन अगदी प्रसन्न झालं. दुसऱ्या दिवशी आम्ही मॅन्ग्रोव्ह फॉरेस्टची सफर करुन आलो आणि संध्याकाळी खास भारतीय रेस्टॉरंटमध्ये जेवायला जाण्याचा निर्णय घेतला. सुमारे साडेसहाच्या सुमारास आम्ही तिथे पोहोचलो. रेस्टॉरंट नुकतंच उघडलेलं असावं; फारशी गर्दीनव्हती. आम्ही एका टेबलावर बसलो, मस्तपैकी मसाला चहा ऑर्डर केला आणि मुख्य मेनूवर काय घ्यावं याबद्दल गप्पा मारायला सुरुवात केली.

तेव्हढ्यात आमच्या नजरेस तीन माणसं रेस्टॉरंटमध्ये येताना दिसली. थोड्याच वेळात तेही आमच्या शेजारच्या टेबलावर येऊन बसले. आम्ही नेहमीप्रमाणे आमच्याच गप्पांमध्ये गुंतलो, आणि आमचा संवादही अगदी ओघाने - मराठीतच सुरु होता.
तेवढ्यात आमच्या शेजारी बसलेल्या त्या व्यक्तीचा आवाज आम्हाला ऐकू आला. त्याला बहुतेक आमच्याशी बोलायची इच्छा होती. तो हळूच म्हणाला, "हेल्लो जी, कहाँ से हो आप?"

एकदम अनोळखी माणसाशी सहज बोलायचं असतं, म्हणून आम्ही स्मितहास्य केलं आणि उत्तर दिलं, “Hello, we are good.” आणि पुन्हा आमच्या गप्पांकडे वळलो.

आम्ही दोघेही पनीरची भाजी ऑर्डर करून कोणती नान घ्यावी यावर चर्चाकरत बसलो होतो. गार्लिक नान की काश्मीरी नान - असं आमचं छोटंसं गोड संभाषण चालू होतं.

अचानक पुन्हा तोच आवाज आला, “कहाँ से हो जी आप? बॉम्बे या दिल्ली?” आम्ही थोडे दचकलोच. पंचविशीतले आम्ही दोघं - अनुभवही कमी आणि त्या क्षणी काय बोलावं, काय न बोलावं हेही कळेना. थोडंसं conscious होत आम्ही फक्त एवढंच म्हणालो, “जी, मुंबई से. आप कहाँ से हो?”

त्यावर त्यातील एकाने शांतपणे उत्तर दिलं, “हम पाकिस्तान से हैं।”

झालं! धडधड वाढली. क्षणभर आमचं मन गोंधळून गेलं.

मी डोळ्यांनीच नवऱ्याला इशारा केला - “जास्त बोलू नकोस, सावध राहूया.” आपल्या देशांचे संबंध नेहमीच ताणलेले. त्यात आम्ही परदेशात, अनोळखी लोकांसमोर. काहीही अवघड होऊ नये म्हणून आम्ही मनातल्या मनात स्वतःलाच सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करत होतो.

थोड्याच वेळात ते हळूहळू बोलू लागले की ते कराचीहून आले आहेत. त्या तिघांपैकी एक न्यायाधीश होता, दुसरा बिझनेसमन आणि तिसरा देखील एखाद्या मोठ्या पदावर काम करणारा. नवऱ्यानेही तितकंच मर्यादित आणिनम्रपणे संभाषण पुढे नेलं.

ते विचारत होते, “बॉम्बे में क्या फेमस है? हमें कुछ ऐसा मेन्यू सजेस्ट करो जो इंडियन टेस्ट से ज्यादा मैच हो, पाकिस्तानी टेस्ट नही”

आम्ही अजूनही थोडे गोंधळलेले, थोडे घाबरलेले - तरी सभ्यपणे एकेक उत्तर देत होतो. नवरा कोल्हापुरी असल्याने आमची नजर मेन्यूत ‘Veg Kolhapuri’ वर पडली. तेव्हा आम्ही त्यांना सुचवलं - “व्हेज कोल्हापुरी, गार्लिक नान आणि तवा पुलाव ट्राय करून बघा.” तेवढ्यात आमचं स्वतःचं जेवणही टेबलावर आलं, आणि मी मनातच एक “हश्श!” म्हणत पटकन जेवायला सुरुवात केली.

थोड्याच वेळात त्यांनीही आमच्या सारखंच तेच मेन्यू ऑर्डर केलं. तेवढ्यात मी हळूच नवऱ्याला कुजबुजले, “बापरे, मला तर भीतीच वाटतेय... आपण पटकन जेवून निघूया इथून.”

नवरा फक्त मान हलवून हसला. आम्ही दोघांनी शांतपणे जेवायला सुरुवात केली. पण काय, त्यांच्या प्रश्नांचा ओघ मात्र अधूनमधून सुरुच होता - फार वैतागवाणे नाही, पण आमचं लक्ष जेवणावर केंद्रित होत असताना अचानक येणारे प्रश्न आम्हाला थोडे अस्वस्थच करत होते.

बोलता बोलता त्यांना समजलं की आमच्या लग्नाला फक्त एक वर्ष झालं आहे. त्या तिघांपैकी एक-दोन जण नवऱ्याला वारंवार, अगदी आपुलकीच्या सुरात, “बेटा... बेटा...” असं म्हणताना दिसले. हळूहळू आमची भीती कमी झाली होती, पण एक विचित्र awkwardness मात्र मनात होताच. आम्ही जेवण संपवलं आणि पटकन बिल मागवलं. वेटर आमच्या टेबला जवळ आला आणि शांतपणे म्हणाला, “Sir, your bill is already paid... by the gentlemen sitting next to you.”

क्षणभर आम्हाला काहीच समजलं नाही. डोक्यात एकच विचार - हे काय आता? आम्ही एकमेकांकडे पाहिलं... अवाक्, थोडेच नाही तर पूर्ण पणे हादरलोच.

तेव्हा ते तिघं हसत हसत म्हणाले, “बेटा जी, आप तो हमारे बच्चों जैसे हो. आपसे बात करके अच्छा लगा. हमें भी लगा कि सारे हिंदुस्तानी बुरे नहीं होते... और शायद आपको भी लगा होगा कि सारे पाकिस्तानी नफरत नहीं करते. आपकी वजह से हमें नया खाना ट्राय करने का मौका मिला.”

त्यांनी खूप समजावून सांगितलं, खूप आपुलकी दाखवली. आम्ही कितीही नकार दिला तरीही त्यांनी बिल भरायचा हट्टच धरला. उलट वरून तोंडभरून आशीर्वाद देत म्हणाले, “खुश रहो, तुम दोनों की शादीशुदा ज़िंदगी हमेशा सुखी रहे.”

आम्ही त्या क्षणी अक्षरशः गोंधळलो होतो - कृतज्ञता, लाज, थोडी भीती आणि थोडा विश्वास... सगळंच एकत्र मिसळलेलं. त्या वेळी आम्ही फक्त नम्रपणे, “Thank you...” इतकंच म्हणू शकलो आणि तिथून बाहेर पडलो.

मनातली एक विशिष्ट देशाबद्दलची मते - ती पूर्णपणे पुसली गेली नाही, पण त्यातली थंड, कठीण थर मात्र नक्कीच वितळला. कारण त्या दिवशी समजलं की सगळेच माणसं वाईट नसतात, आणि सीमा, युद्ध, इतिहास यांच्या पलीकडे ही साधी, आपुलकीची माणुसकी अस्तित्वात आहे.

लंगकावीतील बाकीची ठिकाणं आज फारशी आठवत नाहीत... पण समुद्रकिनाऱ्याजवळचं ते छोटंसं हॉटेल, तिथे भेटलेली ती माणसं, आणि ती अनपेक्षित, हृदयाला स्पर्श करून जाणारा अनुभव आजही अगदी लख्ख आठवतो.

## प्रसंग २ - ऑस्ट्रेलिया

२०१९ साली आम्ही ऑस्ट्रेलियाला फिरायला गेलो होतो. संपूर्ण ऑस्ट्रेलियाची सफर अतिशय सुंदर झाली - सिडनी, मेलबर्न, निसर्ग, बीचेस, शहरांची स्वच्छता... सगळंच मनात घर करुन गेलं. तिथले शेवट काही दिवस उजळ आठवणींनी भरलेली होते.

सिंगापूरला परतताना मात्र विमानात एक वेगळीच परीक्षा होती. माझं आठ महिन्यांचं बाळ सतत रडत होतं. किती तरी प्रयत्न करूनही तिला शांत पडत नव्हतं. आम्ही तिला कधी झुलवून पाहिलं, कधी उचलून शांत करण्याचा प्रयत्न केला - पण काहीच उपयोग होत नव्हता. विमानात बरेच भारतीय व परदेशी प्रवासी होते, आणि मध्यमध्ये त्यांच्या नजरा आमच्याकडे वळत असल्याचं जाणवत होतं. त्यातली एक वयस्क चीनी आजी मात्र वारंवार माझ्याकडे पाहत होती.

मी थकले होते, गोंधळले होते - आणि मनात सतत अपराधीपणा की माझ्या बाळामुळे इतरांना त्रास होत असेल. अचानक ती चीनी आजी आपल्या सीटवरुन उठून आमच्याकडे आली. ती अगदीच हळू आवाजात म्हणाली, “मला इंग्रजी नीट येत नाही... पण बाळाचं पोट तपासून पाहू का?”

मी थोडी आश्चर्यचकित झाली, पण तिच्या डोळ्यांतली करुणा दिसत होती. मी मान डोलावली, “ठीक आहे.” त्या म्हणाल्या, “बाळाचं पोट दुखत असावं.” हे सांगून त्यांनी त्यांच्या पर्समध्ये काहीतरी शोधायला सुरुवात केली. काही क्षण हलवे हलवे वस्तू हलवत, उसवून पाहत शेवटी त्यांनी एका लहानशा काचेच्या बाटलीतलं तेल बाहेर काढलं.

त्या बाटलीला हातात धरुन त्या माझ्याकडे पाहत म्हणाल्या, “Rub it on her tummy... तिच्या पोटावर हलकं मसाज करा.” आवाजात मातृत्वाचीच ऊब होती, जणू एखादी आपलीच आजी बोलते आहे.

मी त्या तेलाची हलकेच मालिश सुरु केली आणि हळूहळू बाळाला बरं वाटायला लागलं. थोड्या वेळात बाळ झोपल. त्या लहानशा बाटलीतील तेलाचा फोटो मी काढून ठेवला आणि परत त्यांना द्यायचा प्रयत्न केला, पण त्यांनी हसत सांगितलं , “You keep it.” आजही ते तेल माझ्याकडेच आहे. कितीतरी नवीन आयांना, मैत्रिणींना किंवा बाळांना काही अडचण असेल तर मी ते तेल सुचवते.

यावेळी मला एक गोष्ट समजली - आपल्या पूर्वग्रहांमुळे, अनेकदा आपण एखाद्याबद्दल चुकीचे मत ठरवतो किंवा त्याला ओळखायला चुकतो. प्रवास आणि सहवास हेच आपल्याला खरी माणुसकी, सद्भावना आणि आपुलकी दाखवते.

## प्रसंग ३: मुंबई एअरपोर्ट आणि इटालियन महिला

२०२० साली मुंबईहून सिंगापूरला जाताना आमची फ्लाइट उशिरा उडणार होती. ३–४ तासांचा हॉल्ट होता, आणि मी आणि बाळ एकटेच प्रवास करणार होती. ५ तासांचा प्रवास म्हणुन मी बाळासाठी आवश्यक अन्न आणि बाकी सर्वसामान जास्त ठेवलं नव्हतं, त्यामुळे मनात खूप ताण होता.

मी बसले होते आणि बाळ सतत रडत होत. तेव्हाच एका इटालियन मुलीच्या स्वरुपाची, थोडीशी अनोळखी, गालांवर सौम्य हसू असलेली, दूरच्या देशातून प्रवास करायला आलेली महिला जवळ येऊन बसली. तिचे केस जरा विस्कटलेले होते, पण त्यातही एक वेगळंच सौंदर्य होतं. मी थोडीसं संकोचली होती. हळूहळू ती बोलू लागली, मी ही उत्तर देऊ लागले. बघता बघता ती बाळाशी खेळू लागली, हसवत होती, हातात खेळणी देत होती. मी बाळाला जेवण देताना, बाळ रडत राहिलं, तेव्हा ती जवळ येऊन त्याला हलकं गाठून शांत करण्याचा प्रयत्न करत होती. तिच्या मदतीने चार तास कसे गेले, मला कळलंच नाही.

जातांना मी हळूच तिला “Thank you” म्हणाले, ती हसत म्हणाली, “Kids are God's gift. I am happy I got the chance to help you.”

त्या प्रवासाने मला पुन्हा एकदा शिकवलं - प्रवास फक्त ठिकाणं पाहण्यासाठी नसतो, तर नवीन माणसं भेटून, त्यांच्या सौजन्याने, मदतीने आणि प्रेमाने आपलं मन समृद्ध करण्यासाठी असतो.

## प्रसंग ४: शॅनन एयरपोर्ट

२०२२ साली आम्ही सिंगापूरहून आयर्लंडला शिफ्ट झालो. त्या वेळी आम्ही ठरवलं की फ्लाइटने शॅनन एयरपोर्टला जायचं. हे पूर्ण रिलोकेशन होतं - संपूर्ण सामान आणि कुटुंबासह, आणि त्यावेळी आमच्याकडे दोन लहान मुलं होती. माझा लहान मुलगा नुकताच आजारातून बरा झाला होता. तो थोडा अशक्त झाला होता. तेव्हा तो ८ महिन्यांचा असेल.

लंडनमध्ये थांबल्यावर हॉल्ट जास्त लांब झाला होता, त्यामुळे आम्ही सर्वजण थोडेच थकून गेले होतो. लंडन - शॅननच्या एका तासाच्या फ्लाइटमध्ये माझ बाळ सतत रडत होत, आणि त्याच्यामुळे काहीशी धडपड झाली. अनेक सहप्रवासी, खास करुन भारतीय, आमच्याकडे वेगळ्याच नजरेने पाहत होते - थोड guilt मनात येत होता की कदाचित बाळामुळे त्रास झाला असेल.

इमिग्रेशन काउंटरपर्यंत पोहोचलो, आणि आम्ही रांगेत उभे होतो. माझा मोठा मुलगा थोडा कंटाळलेला दिसत होता. खूप रडत होता.

आणि लहान मुलांना तसा विमान प्रवासात त्रास होतोच - नवीन देश, सर्वकाही नविन.

अचानक रांगेत एक आयरिश आजी दिसली. वयाने सुमारे ७० वर्षे असावी. ती आमच्या बाळाकडे पाहत होती. थोड्या वेळाने ती पुढे गेली आणि त्या ठिकाणच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांशी काहीतरी बोलली.

मग ती मागे येऊन माझ्याकडे पाहून हळूच म्हणाली, तुमच्याकडे लहान बाळ आहे तुम्ही पुढे जा. आम्ही गेलो आणि दरम्यान सुरक्षा कर्मचाऱ्यानेही आम्हाला पुढे सोडले. पुढे इमिग्रेशन ऑफिसर आमच्याशी व्यवस्थित बोलला. सगळं चेक झालं आणि मग म्हणाला, "तुम्ही ठीक आहात का? आयर्लंडमध्ये तुमचं स्वागत आहे. जर बाळासाठी काही हवं असेल, तर कृपया सुरक्षा कर्मचाऱ्यांना कळवा. आम्ही तुम्हाला गरम पाणी देऊ शकतो बाळाचं दूध किंवा अन्न तयार करायचं असल्यास." माझ्यातल्या आईचं मन गहिवरून आल तेव्हा. त्या क्षणी मन भरून आलं. ओळखीचे नसले तरी त्या सगळ्यांच्या बोलण्यात, कृतीत एक प्रचंड माणुसकी, आपुलकी आणि सहानुभूती होती.

प्रवास फक्त ठिकाणं पाहण्याची प्रक्रिया नसते; तो अनुभव, माणसं, निसर्ग आणि त्यांच्या कृतीतून मिळालेली माणुसकी शिकण्याची संधी असते. लंगकावीतील अनपेक्षित भेटी, ऑस्ट्रेलियातील विमान प्रवासातल्या छोट्या मदतीचे अनुभव, आणि आयर्लंडमध्ये आयरिश आजीच्या हृदयस्पर्शी सहकार्याने मला हे शिकवलं की सीमा, भाषा किंवा देश भिन्न असले तरी माणुसकी, प्रेम आणि सहानुभूती सार्वत्रिक आहेत.

नक्कीच, सर्व लोक चांगले नसतात, पण याचा अर्थ असा नाही की सगळे वाईट आहेत. अलीकडच्या काळात जगाने द्वेष, संघर्ष आणि युद्ध पाहिले आहेत, तरीही जग अजूनही चालू आहे, कारण अजूनही काही चांगले लोक आहेत - जे आशा, प्रेम आणि नैतिकतेवर विश्वास ठेवतात.

प्रत्येक प्रवासाने मला नवीन अनुभव, धैर्य आणि समज दिली. प्रत्येक भेट, प्रत्येक मदत, प्रत्येक स्मित - हे सगळं मनात घर करून जाते. प्रवास आपल्याला केवळ जग दाखवत नाही, तर आपले विचार, आपुलकी आणि सहानुभूती यांचाही विस्तृत अनुभव घडवतो. जगभरात अजूनही चांगले लोक आहेत, आणि त्यांच्या कृतीमुळे हे जग अजूनही आशेने आणि प्रेमाने चालू आहे..




दीपिका अभिजीत कुलकर्णी

दीपिका कुलकर्णी या २०२२ पासून लिमरिक आयर्लंड येथे वास्तव्यास आहेत. लेखन आणि वाचन यांमध्ये त्यांना खास रुची असून त्यांनी डिजिटल मीडिया मध्ये एमबीए केले आहे. सध्या त्या एका प्रसिद्ध शैक्षणिक साहित्य संबंधित कंपनीत डिजिटल सेल्स मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. या आधी त्यांनी महाराष्ट्र मंडळ सिंगापुर च्या ऋतुगंध या मासिकाचे उपसंपादक म्हणून ३ वर्ष काम पहिले आहे. तसेच २०१८ मध्ये कवितेचं पान या कवितेच्या कार्यक्रमात सादरीकरण केले आहे.

# घरापासून लांबचं घर:
## Marathi Mandal Ireland!



सुरुवात करायच्या आधी सगळ्यात महत्वाचं सांगावसं वाटतंय ते म्हणजे आम्ही डब्लिन मधे राहिलो त्या घराबद्दल! आणि तिथे मिळालेल्या आपुलकी बद्दल! मनोज धिर्डे आणि स्नेहल प्रभुकेळुस्कर कुटुंबाचे खूप आभार 🙏 त्यांनी त्यांच्या घराचा दरवाजा पूर्णपणे उघडून दिला होता. त्यांच्या वयात येणाऱ्या मुलांनी आपल्या privacy la प्राधान्य न देता माझ्यासाठी बॅकफूट वर स्वतःच्या घरात वावरणे हि अत्यंत गोड, मन जिंकणारी गोष्ट होती.

Jallosh 2025 साठी Marathi Mandal Ireland ने मला आणि संगीतकार आदिनाथ पातकर व ओंकार इंगवले यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमाची तयारी, टीमची एकजूट, आणि केलेलं मनापासूनचं आदरातिथ्य - यामुळे आम्हा कलाकारांचा आयर्लंड भेटीचा अनुभव अविस्मरणीय बनवला. हा कार्यक्रम भारताबाहेरच्या माझ्या काही best आणि अविस्मरणीय कॉन्सर्ट्सपैकी एक होता.

कार्यक्रमाचे नियोजन अतिशय मजबूत आणि सखोल केले गेले होते. प्रत्येक टप्प्यात टीमची तयारी जाणवली. पुढे येऊ शकणाऱ्या अडचणींचा आणि आव्हानांचा व्यवस्थित विचार करून त्याची पूर्वतयारी आणि आयोजन कौतुकास्पद होते.

शेवटच्या क्षणी आलेल्या आव्हानांचादेखील शांतपणे आणि प्रभावीपणे सामना करण्यात आला. कलाकारांच्या बॅग उशिरा मिळाल्याचे आव्हान टीमने अत्यंत प्रभावी पणे हाताळले. सतत संपर्क, अपडेट्स आणि सपोर्ट देत प्रत्येक कलाकाराला त्यांचे सामान मिळेपर्यंत साथ दिली. टीमची कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्याची निखळ इच्छाशक्ती दिसून येत होती. संपूर्ण कार्यक्रमात एकच गोष्ट स्पष्ट होती - “बेस्ट देण्याची इच्छाशक्ती.”

## या यशामागील स्तंभ – Marathi Mandal Ireland टीम

• Stage Crew Support: मनीष गजरे - Singers, Players यांची निवड याबद्दल आभार आणि Online discussions च्या आधारावर, तयारीत असलेल्या सगळ्या singers आणि players चे खूप कौतुक करावेसे वाटते.

• Event Coordination: सुरश्री भट आणि मयूर महाजन - त्यांच्या नियोजनात ताकद आणि अंमलबजावणीत काटेकोर स्पष्टता दिसून आली. गाण्यांचा लाईनअप आणि costume changes मागची तयारी, धावपळ आणि त्यात 'चहा' हा आनंददायी आणि मजेशीर अनुभव होता.

• Sound & Rehearsal Support: ध्रुव जोशी आणि कोमल बोराडे - कार्यक्रमाची ध्वनीगुणवत्ता आणि कलाकारांची तयारी यामागील महत्त्वाचे आधारस्तंभ होते.

• Transport & Logistics: चिन्मय सहस्रबुद्धे - वेळापत्रक, सतत च्या फेऱ्या, शेवटच्या क्षणी लागणाऱ्या गोष्टी - सर्व काही सहजतेने व धीराने सांभाळून अगदी एअरपोर्ट वर security होई पर्यंत थांबून त्यांनी आमची व्यवस्थित रवानगी केली.

• या व्यतिरिक्तही अनेक कार्यकर्ते पडद्याआड खूप मेहनत करत होते - संपूर्ण organising team, स्टेजवर “ऐका दाजिबा...” चा vibe उंचावणारे उत्साही dancers, आणि सर्वात महत्त्वाचं - Audience!

Seats सोडून पुढे येऊन केलेल्या गाण्यांच्या मागण्या याने मला मिळालेला energy boost...
या सगळ्यांनी शो चा हुरूप खूपच वाढवला.

शेवटी एवढंच म्हणावसं वाटतंय... जेव्हा एक टीम मनापासून काम करते, तेव्हा परिणाम अविस्मरणीयच ठरतात!



- Vaishali Samant

**MMI Title Sponsor**
**Sep 2025 to Sep 2026**












# CALENDAR 2026
# कार्यक्रम दिनदर्शिका



# २०२६ कार्यक्रम दिनदर्शिका

| | | |
|---|---|---|
| १० जानेवारी | **चित्रपट प्रदर्शन:** **क्रांतीज्योती विद्यालय – मराठी माध्यम** |  |
| मार्च | **बॅडमिंटन स्पर्धा** |  |
| १७ मार्च | **St. Patrick's Day वादन** | |
| मे ३रा आठवडा | **विद्यार्थी मेळावा** |  |
| जून | **चेस-कॅरम स्पर्धा** |  |
| १९ सप्टेंबर | **जल्लोष आणि गणेशोत्सव** २०२६ |  |
| ३१ डिसेंबर | **आभा – वार्षिक अंक** | |

अधिक माहिती लवकरच आमच्या वेबसाईट आणि सोशल मीडिया हँडल्सवर उपलब्ध होईल.

(*तारखा बदलण्याची शक्यता आहे)

# जल्लोष २०२६ – "उत्सव भारती"

भारत म्हणजे केवळ एक देश नसून, तो भावनांचा, संस्कृतींचा आणि परंपरांचा संगम आहे - भाषा, वेषभूषा, खाद्यसंस्कृती, कला, संगीत आणि सण! यंदाच्या जल्लोष मधे भाषा, धर्म, प्रांत वेगळे असले तरी भारताची अखंड एकता दिसून येईल.

"उत्सव भारती" हा जल्लोष २०२६ चा प्रमुख विषय भारताच्या बहुरंगी स्वरूपाचे दर्शन घडवणारी असेल. भारतातील विविध प्रांतांचे सण, लोककला, नृत्य, संगीत आणि परंपरा यांमधून भारताची एकत्रित उत्सवसंस्कृती उलगडली जाईल.

गणेशोत्सवाच्या पवित्र आणि सार्वत्रिक भावनेभोवती गुंफलेला हा सांस्कृतिक जल्लोष, मराठी मंडळ आयर्लंड (MMI) च्या माध्यमातून भारताबाहेर राहणाऱ्या सर्व भारतीय समुदायांना एकत्र आणणारा उपक्रम असेल. देश वेगळा असला तरी संस्कृती, मुळे आणि भावना समान आहेत – ही जाणीव "उत्सव भारती" अधोरेखित करेल.

भारत किती बहुआयामी, समृद्ध आणि सर्वसमावेशक आहे, हे जगाला आणि स्वतःलाच पुन्हा एकदा अभिमानाने दाखवणारा हा सोहळा असेल.

**जल्लोष २०२६ - उत्सव भारती**
**एक भारत | एकत्र उत्सव**

मराठी मंडळ आयर्लंड

# Marathi Mandal Ireland

contact@irishmarathi.com

irishmarathi.com

@MarathiIreland

@Marathi.MandalIreland

@Marathi.MandalIreland

@marathimandalireland

@marathi.mandalireland

